# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## २३/०२/२०१० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.२७) इतिवृत्त

मंगळवार, दिनांक २३/२/२०१० रोजी मा.सभापती **श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे दुपारी ३.३० वाजता 'वंदे मातरम्' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त डॉ.पुरूषोत्तम भापकर, भा.प्र.से., नगर सचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबंधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.

०१. श्री.सतीश कटकटे
०२. श्री.रविकांत काशीनाथ गवळी
०३. श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर
०४. श्री. सुरे सिताराम इसराम
०५. श्री.विनायक पांडे
०६. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
०७. श्री. देसरडा प्रशांत सुभाष
०८. श्री. घडमोडे भगवान देवीदास
०९. श्री.कचरू सोनवणे
१०. श्री.प्रल्हाद निमागांवकर
११. श्री.दामोधर माधवराव शिंदे
१२. श्रीमती मेहरून्नीसा खान
१३. सौ. मोमीन सफिया फिरदौस

**<u>संवाद :</u>**

श्री.रविकांत गवळी : शिवसेनेचे जेष्ठ नेते मा.श्री.मधुकरराव सरपोतदार यांचे ह्दयाविकाराच्या झटक्याने निधन झालेले आहे. सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली वाहण्यात यावी.

श्री.भगवान घडमोडे : अनुमोदन आहे.

मा.सभापती : शिवसेनेचे जेष्ठ नेते मा.श्री.मधुकरराव सरपोतदार यांचे ह्दयाविकाराच्या झटक्याने निधन झालेले आहे. सभागृहाच्या वतीने दोन मिनटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली वाहण्यात यावी.
(सभागृहाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.)

श्री.सतिष कटकटे : सिल्लेखाना येथील रस्त्याचे पुर्वी रुंदिकरण झाले होते त्यावेळी तत्कालिन आयुक्तांनी संतोषी माता मंदिराबाबत पत्र देण्यात आले होते. वारंवार प्रशासनाकडे मी विषय मांडलेला आहे. प्रशासनाने कुठली कार्यवाही केलेली आहे.

मा.सभापती : प्रशासनाने खुलासा करावा.

उपआयुक्त(सिडको) : संतोषीमाता मंदिर येथील दोन टपऱ्यांची प्रशासकीय अधिकारी यांनी पहाणी केलेली आहे. दोन दिवसांत टपऱ्या काढण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. टपरीधारक यांचे

घरी दु:खद घटना घटली असल्याने दोन दिवसांची मुदत मागीतली आहे. दोन दिवसानंतर टपऱ्या काढल्या नाही तर प्रशासन योग्य ती कार्यवाही करेल.

श्री.मेहरून्निसा खान : टपरी काढण्यासंदर्भांत प्रशासनास पत्र देण्यात आले आहे परंतु अद्यापपर्यंत टपरी काढण्यांत आलेली नाही.

मा.सभापती : टपरी काढण्यांत यावी.

श्रीमती सफिया मोमीन : माझ्या वॉर्डात 70 लाखाचे डी.पी.रोडची कामे चालू आहे. रंगरंगोटी नाही, फुटपाथ नाही. आदीनाथ कन्स्ट्रक्शन काम करीत आहे. त्यांची सर्व कामे व्यवस्थीत नाही. शेडयुल बी अन्वये माझ्या वार्डातील कामे झालेली नाही.

मा.सभापती : कामाची पहाणी करून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

श्री.प्रशांत देसरडा : प्रशासनाने प्रशासकीय स्तरावर अधिकारी कर्मचारी यांच्या पदोन्नत्या केल्या आहेत त्याबाबतीत खुलासा करण्यात यावा.

सहाय्यक आयुक्त-1 : 18 फेब्रुवारी 2010 रोजी झालेल्या आस्थापना कमिटीमध्ये 10 कनिष्ठ लिपीक कर्मचाऱ्यांना वरिष्ट लिपीक संवर्गात पदोन्नती देण्यात आली. 5 शाखा अभियंता यांना 12 वर्षानंतरची समयश्रेणी देण्यात आली.03 शाखा अभियंता संवर्गातील कर्मचाऱ्यांना उपअभियंता संवर्गात पदोन्नती देण्यात आली. आरसीएचच्या 32 कर्मचाऱ्यांपैकी एक कर्मचारी तलीत काझी महिला कर्मचारी यांनी नौकरी सोडुन गेल्यामुळे 31 कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी आदेश दिलेले आहे. 54(1) अन्वये ज्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती झालेली होती आणि ते पुर्वीपासुन मनपाच्या सेवेत होते. अशा 10 कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमीत करण्यात आलेल्या आहेत.

श्री.सतिष कटकटे : सर्वसाधारण सभेसमोर सदरील कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव आले होते का?

सहाय्यक आयुक्त-1 : सन 2006 रोजी प्रस्ताव आला होता तो तुर्तास रद्द करण्यात आला होता. आरसीएचच्या कर्मचाऱ्यांना सन 2009 रोजी कायम करण्यात आले होते. सप्टेंबर 2009च्या सभेमध्ये चर्चेसाठी आला मा.आयुक्तांनी जे आदेश पारित केलेले होते ते सध्यास्थितीत स्थगीत केलेले होते. या संदर्भांत चौकशी समिती गठीत केली होती मुख्य लेखापरिक्षक यांचेकडे चौकशी देण्यात आली होती त्यांच्या अहवालानुसार शासनाने या कर्मचाऱ्यांना आरसीएच फेज-2 मध्ये विहित मार्गाने जे नियुक्त आहेत त्यांना सेवेत नियमीत करण्यासाठी 40 पदांना शासनाने मान्यता दिलेली आहे.

श्री.प्रशांत देसरडा :मुख्यलेखापरिक्षक निवड समितीचे सदस्य असतांना चौकशी कशी करू शकतात का? 54(1) अन्वये किती प्रकरणे प्रशासनाकडे आलेले आहे. कर्मचाऱ्यांना पदोन्नती, 12 वर्षाची समयश्रेणी हि किती वर्षानंतर कर्मचाऱ्यांना देण्यात आली.

सहाय्यक आयुक्त-1 : एकुण आज 248 कर्मचारी आहेत. 10 कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिल्यानंतर 79 कर्मचारी पदोन्नतीसाठी बाकी आहेत. जश्या जागा रिक्त होतील त्याप्रमाणात पदोन्नत्या दिल्या जातील.

श्री.प्रशांत देसरडा : कर्मचाऱ्यांना न्याय केव्हा दिला.

सहाय्यक आयुक्त-1 : जेव्हा पदे रिक्त झाली तेव्हा न्याय देण्यात आला. यापुर्वी तीन वेळेस प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे.

श्री.प्रशांत देसरडा : सर्वसाधारण सभेने निर्देश दिले होते की, सगळे प्रस्ताव एकत्रित करा. प्रकल्पग्रस्त वाहनचालक श्री.बोडखे वारंवार प्रशासनाकडे फॉलोअप केलेला आहे.

श्री.भगवान घडमोडे : आरसीएच बाबत माहिती देण्यात यावी. विकास कामे करण्यासाठी प्रशासनाकडे निधी नाही.

आरोग्य वै.अधिकारी : केंद्रशासनाचा माता बाल संगोपनाचा कार्यक्रम आहे शहरात आणि ग्रामीण भागात राबविण्यात येतो. महानगरपालिकेने सदर कार्यक्रम राबविण्यासाठी ठराव घेऊन मान्यता दिलेली आहे त्यानंतर शासनाने मंजूरी दिलेली आहे. शासनाचे म्हणण्यानुसार पाच वर्षानंतर सदरचा कार्यक्रम जनतेच्या गरजेचा असल्यामुळे तो पुढे तसाच चालु

| | |
|---|---|
| | ठेवावा आणि त्याचा संपुर्ण खर्च महानगरपालिकेने किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेने करावा.आरसीएच-1 कार्यक्रम सन 2007 मध्ये पाचवर्ष पुर्ण होऊन राबविण्यात आला. यामध्ये जे अधिकारी कर्मचारी होते त्यांना आस्थापनेवर घेण्याचा ठराव करण्यात आला व नंतर शासनाची त्यास मंजूरी आली. |
| श्री.भगवान घडमोडे | :शासनाने नावानिशी मंजूरी दिलेली आहे काय? |
| आरोग्य वै.अधिकारी | :शासनाच्या ठरावात स्पष्ट वाक्य लिहिले आहे की, जे लोक यामध्ये काम करीत आहे त्याच लोकांना सामावुन घेण्यात यावे. |
| श्री.भगवान घडमोडे | :शासनाचे कायमस्वरूपी नियुक्ती करावे म्हणुन आदेश आहेत का? सदरील कर्मचारी मनपाच्या सेवेत कार्यरत नाही. |
| मा.सभापती | :आरसीएच बाबत शासनास जे पत्र देण्यात आले ते वाचुन दाखविण्यात यावे. |
| मा.सभापती | :दिनांक 09.02.2010 रोजी शासनाकडे अहवाल पाठविण्यात आलेला आहे का. |
| सहाय्यक आयुक्त-1 | :शासनाकडे अहवाल पाठविण्यात आला आहे. |
| मा.सभापती | :तत्कालिन आयुक्त यांनी शासनाकडे प्रथम जे पत्र पाठविले होते त्या पत्राची छायांकित प्रत सर्व सदस्यांना देण्यात यावी. |
| श्री.विनायक पांडे | :वार्ड फ कार्यालयात चतुर्थ श्रेणी कर्मचारी श्री.दौलत सलामबाद यांचे 1124 मध्ये सिनॅरिटीमध्ये नांव आहे आजपर्यंत कायमस्वरूपी नियुक्ती करण्यात आलेली नाही. सहा वर्षापासुन दैनिक वेतनावर ठेवण्यात आलेले आहे. |
| सहाय्यक आयुक्त-1 | :सप्टेंबर-2003 मध्ये मान्यता आलेली होती 1124ची मान्यता आलेली होती. अॅन्टी करप्शनच्या केसमध्ये कमी करण्यात आले होते ज्यावेळेस भरती झाली त्यावेळेस त्याचा विचार झालेला नाही. 2006 साली न्यायालयाने जेव्हा त्यांना निर्दोष सोडण्यात आले त्यानंतर त्यांना पुन्हा घेतलेले आहे. |
| श्री.भगवान घडमोडे | :श्री.ठोंबरे अग्निशमन विभागातील कर्मचारी 1124 मधील आहे त्यालाहि अद्यापपर्यंत कायम करण्यात आलेले नाही. |
| श्रीमती सफिया मोमिन | :आजपर्यंत किती कर्मचाऱ्यांना आरसीएचमध्ये निलंबीत केले आहे खुलासा करण्यात यावा. |
| आरोग्य वैद्य.अधिकारी | : डॉ.फरीन तबस्सुम यांचेसंबंधी बरेच तक्रारी होत्या. त्यांना खुप वेळा कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. |
| मा.सभापती | : काय तक्रारी आहेत, मागावून घ्यावे. श्री.सलामबाद यांना कायमस्वरूपी सेवेत केव्हा करणार आहात खुलासा करण्यात यावा. |
| सहाय्यक आयुक्त-1 | :दैनिक वेतनावर 167 कर्मचारी कार्यरत आहेत. सफाई मजूर संवर्गामध्ये लाड समितीचा 1992च्या जि.आर.नुसार तो कर्मचारी मृत पावला नौकरी सोडलीतर त्याच्या वारसाला नौकरी द्यावी लागते. |
| श्री.रविकांत गवळी | : 2006 ला कर्मचारी बाबत सर्वसाधारण सभेत विषय होता. त्यावेळी सविस्तर प्रस्ताव ठेवावा म्हणून सूचना होत्या. |
| श्री.प्रशांत देसरडा | : आरसीएचच्या संदर्भात प्रसारमाध्यमांकडे नगरसेवकांबाबत विरोधक भुमिका मांडली जात आहे. काही सिमा असतात. |
| मा.सभापती | : दिनांक 20.01.2010 मध्ये सर्वसाधारण सभेमध्ये कायम करण्याचा प्रस्ताव होता. सर्व प्रस्ताव एकत्र ठेवण्यात यावे म्हणून निर्णय झाला होता. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | :प्रशासनाने प्रशासकीय स्तरावर जे आदेश काढलेले आहे ते थांबविण्या बाबत मा.स्थायी समितीला अधिकार आहेत का? जे कर्मचारी सेवेत घेण्यात आले त्यांची शैक्षणिक पात्रता,आरक्षण पहाण्यात आले आहे का तसेच प्रकल्पग्रस्त व इतर कर्मचाऱ्यांना सेवेत का नाही घेतले गेले. RCH प्रकरण खोलात गेले तर कॉन्ट्रॅक्ट बेस आहे. मोव्हमेंट करण्यात आली. पूर्वीचे आयुक्त यांनी आदेश काढले. |
| मा.सभापती | : वैद्य साहेबांनी ते आदेश रद्द केले. |

श्री.भगवान घडमोडे : प्रशासनाने जे निर्णय घेतलेले आहे त्याबाबत ट्रस्टी म्हणुन अंकुश ठेवण्याचे अधिकार स.सदस्यांना आहेत का?

मा.सभापती : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 53 अंतर्गत सर्वसाधारण सभेला आणि स्थायी समिती सभेला पुर्ण अधिकार आहेत.

श्री.भगवान घडमोडे : दैनिक वेतनावरील कर्मचारी कित्येक वर्षापासुन पालिकेच्या सेवेत आहे त्या कर्मचाऱ्यांना कायम करण्यात येत नाही.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : स्थायी समितीला प्रशासनाने ज्या नियुक्त्या केलेल्या आहेत त्या रद्द करण्याचा अधिकार आहेत काय?

मा.सभापती : करार पध्दतीने घेतलेल्या कर्मचाऱ्यांना कायम केले जाते. सर्वसाधारण सभेने मा.आयुक्तांनी सदरील कर्मचाऱ्यांचे आदेश रद्द केल्यानंतर परत प्रशासनाने आदेश काढुन कर्मचाऱ्यांना कायम केले. करार पध्दतीने घेतलेल्या कर्मचाऱ्यांना कायम करण्याचा अधिकार आहे का?

प्रशासनाने सर्व कागदपत्र सदस्यांना दाखविण्यात यावे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 71 अन्वये प्रशासनाकडुन कुठलेही कागदपत्र मागण्याचा अधिकार सर्वसाधारण सभा, स्थायी समिती आहेत. सर्वसाधारण सभेचे जे आदेश दिले होते त्याचे पालन करण्यात आले आहे काय?

सहाय्यक आयुक्त-1 : सर्वसाधारण सभेत मा.आयुक्तांनी तुर्त आदेशास स्थगीती दिली होती चौकशीअंती निर्णय घेण्यात येईल म्हणुन सांगण्यात आले होते.

मा.सभापती : तत्कालिन आयुक्त यांनी दिलेल्या पत्राची छायांकित प्रत देण्यात यावी. तत्कालिन आयुक्तांनी 24.07.2007 रोजी प्रधान सचिव यांना पत्र पाठविण्यात आले होते आरसिएचचे कार्यरत पदे करारपध्दतीने भरण्यात आल्याबाबत कळविण्यांत आले होते. सदरील पदे कायमस्वरूपी कोणत्या कायद्याअंतर्गत करण्यात आले.

सहाय्यक आयुक्त-1 : या संदर्भात 16 मे 2008 रोजी शासन निर्णय आलेला आहे. शासनाने मंजूरी दिलेली आहे.

मा.सभापती : नेमणुकीचे अधिकार कोणाला आहे.

श्री.प्रशांत देसरडा : 40 पदांना मंजूरी घेण्यात आली त्याचवेळी कर्मचाऱ्यांच्या नावानिशी मंजूरी का घेण्यात आली नाही. तत्कालिन आयुक्तांनी महानगरपालिकेची आर्थीक स्थिती बरोबर नसल्याने सदरील कर्मचाऱ्यांना कंत्राटपध्दतीने ठेवण्यात येतील म्हणुन सांगीतले होते.

मा.सभापती : शासनाचे पत्र वाचुन दाखविण्यात यावे.

नगर सचिव : महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दि.5 फेब्रुवारी 2010 चे उप सचिव, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र- "शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना करारपध्दतीने नियुक्त्या, पुनर्नियुक्त्या व मुदतवाढी देण्यात आल्याच्या विरोधात डॉ.जगन्नाथ ढोणे व इतर यांनी उच्च न्यायालय, मुंबई येथे क्र.85/2008 ही जनहित याचिका दाखल केली होती. सुनावणीच्या दरम्यान याचिकाकर्त्यांनी सेवानिवृत्तीनंतरच्या करारपध्दतीवरील नियुक्त्या, पुनर्नियुक्त्या, मुदतवाढी यासंबंधीची अनेक नियमबाह्य प्रकरणे मा.उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली होती. यावर मा.उच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त करून करारपध्दतीवरील नियुक्त्या, सेवानिवृत्तीनंतरच्या पुनर्नियुक्त्या, मुदतवाढी सर्व प्रकरणाचे पुनर्विलोकन करण्यात यावे तसेच ज्या करार पध्दतीच्या नियुक्त्या, सेवानिवृत्तीनंतरच्या पुनर्नियुक्त्या, मुदतवाढी नियमबाह्य आढळून येतील अशा सर्व नियुक्त्या तात्काळ रद्द करण्यात येतील व यापुढे शासनाच्या दिनांक 15/2/95 व दि.9/11/95 च्या शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या धोरणाच्या विरूध्द कोणत्याही सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यास करार पध्दतीने/मुदतवाढीने व पुनर्नियुक्तीने

नेमणूका दिल्या जाणार नाहीत, असे स्पष्ट शपथपत्र शासनाच्या वतीने दाखल करावे, असे आदेश दिले होते.

त्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेने शासनाच्या वतीने मा.उच्च न्यायालयात शपथपत्र दाखल करण्यात आले आहे. त्यानुसार शासकीय, निमशासकीय, संविधानिक, सेवानिवृत्तीनंतरच्या पुर्ननियुक्त्या, मुदतवाढी या सर्व प्रकरणांचा आढावा घेवून व ज्या नियुक्त्या शासनाच्या वर नमूद केलेल्या शपथपत्राप्रमाणे व मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे आढळून येणार नाहीत अशा सर्व करारपध्दतीवरील नियुक्त्या, सेवानिवृत्तीनंतरच्या पुर्ननियुक्त्या, मुदतवाढी तात्काळ रद्द करून त्याबाबतचे प्रमाणपत्र प्रधान सचिव/सचिव यांच्या स्वाक्षरीने सादर करावयाचे आहे. याबाबत दिनांक 11/2/2010 रोजी प्रधान सचिव (सेवा) सामान्य प्रशासन विभाग हे आढावा घेणार आहेत. तरी वरीलप्रमाणे आपल्या विभागात जर पुर्ननियुक्त्या, मुदतवाढी दिल्या असल्यास त्याबाबत उपरोक्त नुसार आढावा घेऊन मुदतवाढी योग्य असल्याबाबत व तशा नसल्यास त्या नियुक्त्या रद्द करणेबाबत कार्यवाही करून त्याबाबतचा अहवाल कोणत्याही परिस्थितीत दिनांक 9/2/2010 पर्यंत कृपया सादर करावा. जेणेकरून त्यानुसार प्रमाणपत्र मा.प्रधान सचिव यांना सादर करता येईल."

श्री.प्रशांत देसरडा :सर्वसाधारण सभेने दिलेल्या निर्णयानंतर प्रशासनाने ठरावासंदर्भांत काय मत दिले होते खुलासा करण्यात यावा.

श्री.रविकांत गवळी :आरसीएच प्रकल्प करार पध्दतीने होता काय, महानगरपालिकेला स्वत: आरसीएच कार्यक्रम राबविता येतो काय?

श्री.प्रशांत देसरडा :सर्वसाधारण सभेने घेतलेला ठराव आत्तापर्यंत स्थगीत आहे का मंजूर आहे खुलासा करण्यात यावा.

सहाय्यक आयुक्त-1 :या नियुक्त्यांना सर्वसाधारण सभेची मान्यता नाही.

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा केला आहे की, सर्वसाधारण सभेची मान्यता नाही.

श्री.रविकांत गवळी :पुर्वी प्रशासनाला मान्यतेची आवश्यकता नव्हती का? धोरणात्मक पॉलिसी मंजूर करण्याचा अधिकार प्रशासनाला आहे का?

मा.सभापती :करार पध्दतीने कर्मचाऱ्यांना मनपाच्या सवेत घेतलेले आहे त्यांना कुठल्या नियमान्वये कायमस्वरूपी नियुक्ती करता येईल खुलासा करण्यात यावा.

सहाय्यक आयुक्त-1 :आरसीएचच्या कर्मचाऱ्यांना 16 मे 2008च्या शासन आदेशानुसार कायम करण्यात आलेले आहे.

श्री.भगवान घडमोडे :करार पध्दतीने घेतलेल्या कर्मचाऱ्यांना मनपाच्या सेवेत कायमस्वरूपी घेता येते का?

सहाय्यक आयुक्त-1 :मा.सुप्रीम कोर्टाचे सन 1992चे सायटेशन आहे की, एखाद्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आणि नियमीत त्यास दोन वर्ष सतत वाढ देत गेले तर याचा अर्थ आस्थापनेला त्या कर्मचाऱ्याची गरज आहे. आरक्षणानुसार,शैक्षणिक पात्रतेनुसार पद उपलब्ध होतील त्या वेळेस त्या कर्मचाऱ्यास सेवेत समाविष्ठ करून घ्यावे.

श्री.प्रशांत देसरडा :सदरील आदेश हा दैनिक वेतनावर कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी लागु होतो.

मा.सभापती :सुप्रीम कोर्टाच्या आदेशान्वये भरती करण्यात आलेली आहे काय? मा.सुप्रीम कोर्टाने निर्देश दिलेले होते काय? मा.सुप्रीम कोर्टाचा निर्णय सन 1992 रोजीचा आहे. आरसीएच कर्मचाऱ्यांना आता नियुक्त्या दिलेल्या आहेत.

सहाय्यक आयुक्त-1 :सन 1999 रोजीच निर्णय घेण्यात आलेला आहे पाच वर्षाचा कालावधी संपल्यानंतर सन 2002 पासून महानगरपलिका सदरील प्रकल्प स्वत: चालवेल त्यावर होणारा खर्च मनपा फंडातुन करण्यात येईल असा निर्णय सन 1999 रोजी घेण्यात आला.तत्कालिन आयुक्तांनी शासनाला,केंद्र शासनाला पत्र देण्यात आलेले आहे.

मा.सभापती :तत्कालिन आयुक्त यांनी जा.क्र./मनपा/आरोग्य/82/2007 कार्यालय महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांना पाठविलेले पत्र बनावट आहे का?

सहाय्यक आयुक्त-1 :बनावट असल्याबाबत खुलासा करण्यात आलेला नाही.

श्रीमती मेहरून्निसा खान : मा.सुप्रिम कोर्टाच्या आदेशाप्रमाणे नियुक्त्या करण्यात आलेले आहेत का?

मा.सभापती :पॉलिसी डिसीजन घेण्याचा निर्णय कोणाला आहे.

सहाय्यक आयुक्त-1 :शासनाने निर्णय घेतलेला आहे.

मा.सभापती :औरंगाबाद महानगरपालिकेचा पॉलिसी डिसीजन घेण्याचा अधिकार प्रशासनाला आहे. अशी नोंद घेण्यात यावी. इतर महानगरपालिकेकडुन आरसीएच बाबत खुलासा घेण्यात आला आहे का?

श्री.भगवान घडमोडे :करार पध्दतीने कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेत घेता येते का? खुलासा करण्यात यावा.

सहाय्यक आयुक्त-1 :तत्कालिन आयुक्तांनी दिनांक 24.07.2007 रोजी शासनाला जे पत्र पाठविले होते त्यानुषंगाने 16 मे 2008 रोजी शासनाने मान्यता दिलेली आहे.

मा.सभापती :40 पदे मंजूर झालेली आहेत त्याची प्रोसेस काय आहे. सर्वसाधारण सभेने ठराव मंजूर कलेला आहे.

मा.सभापती :सर्वसाधारण सभेने ठराव मंजूर केलेला नाही प्रशासनाने खुलासा केलेला आहे.

सहाय्यक आयुक्त-1 :मनपाच्या आस्थापनेवर प्रत्येक वर्षी जे पदे रिक्त झाली त्याचा आढावा आरक्षणानुसार घेऊन नविन वर्षामध्ये पद भरण्यासाठी संचिका सादर करण्यात येते. व्हर्टिकल आणि जातीनिहाय आरक्षण दोन्ही नमुद करून एकुन पदे किती आहेत कोणत्या संवर्गाची आहेत लेखी स्वरूपात लिहुन मा.आयुक्तांची मान्यता घेऊन स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात येते त्या जाहिरातीनुसार 15 दिवसांचा वेळ देण्यात येतो या पदास अर्हता धारण करणाऱ्या लोकांनी अर्ज करावेत. त्यानुसार अर्ज आल्यानंतर अर्जाची छाननी करून जे पात्र अपात्र आहेत त्यांची यादि तयार केली जाते जे पात्र आहेत त्यांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येते. एका जागेसाठी तीन पैक्षा जास्त उमेदवार असतील तर लेखी परिक्षा घेण्यात येते. लेखी परिक्षेत गुणवत्तेनुसार एकास तीन या प्रमाणात मुलाखतीस बोलविण्यात येते. मुलाखतीत ज्या उमेदवाराची निवड होईल त्यास नियुक्तीचे आदेश देण्यात येते.

श्री.प्रशांत देसरडा :प्रशासनाने जो खुलासा केलेला आहे त्यात आरसीएच बाबतीत हि सर्व पुर्तता करण्यात आलेली आहे काय?

सहाय्यक आयुक्त-1 :सदरील कर्मचाऱ्यांना दैनिक वेतनावर घेतांना वर्तमानपत्रात जाहिरात दिलेली आहे.

श्री.प्रशांत देसरडा :दैनिक वेतनावर असतांना सदरील कर्मचारी महानगरपालिकेच्या सेवेत होते का?

सहाय्यक आयुक्त-1 :महानगरपालिकेने जाहिरात दिलेली आहे.

श्री.प्रशांत देसरडा :दैनिक वेतनावर कर्मचारी नियुक्त करतांना तत्कालिन आयुक्तांनी आयुक्त म्हणुन सहि केली का की आरसीएचचे अध्यक्ष म्हणून सहि केली.

आरोग्य वै. आधिकारी:आरसीएचच्या कुठल्याही कार्यक्रमाबाबत मा.आयुक्तांच्या नावांने जाहिरात काढतो तेव्हा अध्यक्ष तथा आयुक्त असा शब्द प्रयोग होतो.

श्री.प्रशांत देसरडा :शासनाच्या सेवेत कायम करतांना शासनाकडुन पदनिर्मीती आली आणि जी प्रोसेस सांगीतली ती आरसीएचला लागु होते का?

श्री.रविकांत गवळी :मा.आयुक्तांनी या संदर्भात खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :महानगरपालिकेवर याचा किती आर्थीक बोजा पडणार आहे.

श्री.प्रशांत देसरडा :प्रशासनाने नियुक्तीबाबत जी प्रोसेस सांगीतली आहे त्याप्रमाणे सदरील नियुक्त्या देण्यात आलेल्या आहेत का?

श्री.भगवान घडमोडे :स.सदस्य श्री.प्रशांत देसरडा यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्याबाबतीतचा खुलासा मा.आयुक्त यांनी करावा.

मा.सभापती :आरसीएच आस्थापनेवर आहे काय? खुलासा करण्यात यावा.

उपआयुक्त(म) :आरसीएच प्रोजेक्ट आरोग्य खात्याअंतर्गत आहे तो महानगरपालिकेमध्येच आहे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :महापालिका हा एनजीओ आहे त्याअंतर्गत स्किम चालत असतात त्याचे अध्यक्ष मा.आयुक्त आहेत. आरसीएच स्किम सर्व महापालिकेला नाही. औरंगाबाद महापालिकेत आहे. आरसीएच आस्थापनेवर आहे काय?

उपआयुक्त(म) :आरसीएचचे कर्मचारी मनपाच्या आस्थापनेवरील नव्हते.

मा.सभापती :नेमणुक झाल्यावर आस्थापनेवर येतील का?

मा.आयुक्त :अतिशय महत्वाच्या विषयावर गेल्या दिडतासापासून चर्चा चालू आहे. 32 कर्मचारी/अधिकारी अनेक वर्षापासुन महापालिकेवर काम करित आहे. त्यांच्या भवितव्याचा आणि आयुष्यभराचा प्रश्नासंदर्भात चर्चा होत आहे. महापालिकेचे अधिकारी कर्मचारी आहेत त्यांच्याकडुन कामाची अपेक्षा आहे त्या प्रमाणे अधिकारी/कर्मचारी त्यांची सेवा, समस्या, आस्थापना याही बाबी पहाण्याचे काम महापालिकेचे आणि महासभेचे आहे आणि आयुक्त म्हणुन माझे आहे. आरसीएचच्या ज्या जागा भरण्यात आलेल्या आहेत. त्या पुर्वी आस्थापनेवर नव्हत्या परंतु आपण ठराव करुन दिला कि कर्मचाऱ्यांना नियमीत करून घेऊ म्हणुन या सर्व जागा महापालिकेच्या आस्थापनेवर आलेल्या आहेत. तत्कालिन आयुक्तांनी सन-2007 मध्ये जो पत्रव्यवहार पाठविला होता . आरसीएचचा प्रकल्प सन-2005 मध्ये चालू झ ाला राज्य शासनाने संपूर्ण राज्यात औरंगाबाद महापालिकेस आरसीएच प्रकल्प राबविण्यासाठी देण्यात आला. माता,मुल यांचे आरोग्य महानगरपालिकेकडे असलेली नेक सिस्टीम, महापालिकेकडे असलेल्या पायाभुत सुविधा, कर्मचारी/अधिकारी महानगरपालिकेकडे नव्हते. माता आणि बालकांचे आरोग्याचे प्रश्न जागतीक,राष्ट्रीय,राज्यस्तरावर महत्वाचे बनले होते म्हणुन पायलट प्रोजेक्ट म्हणुन औरंगाबाद महापालिकेचा समावेष झाला. जर हा प्रकल्प महापालिकेस प्राप्त नसता झ ालातर एक्सीसटिंग कालप्रक्रियेमधुन आजीबात लक्ष देऊ शकत नव्हतो म्हणुन मोठी संधी महापालिकेच्या आरसीएचच्या माध्यमातून मिळाली. सन-1999 मध्ये ठराव झ ाला दुसरा ठराव सन-2007मध्ये झाला यामध्ये शासनास सांगण्यात आले की, आम्ही ही नियमीत करण्यास तयार आहोत. शासनाची पॉलिसी होती की, पाहिल्या पाचवर्ष करार पध्दतीने राहिल नंतर महापालिकेने रेग्युलर केले पाहिजे. शासनास जेव्हा लिहुन दिले महापालिकेने निर्णय घेतला तेव्हा महापालिकेची जबाबदारी बनते की, कर्मचाऱ्यांना रेग्युलर केले पाहिजे. प्रश्न असा आहे की, यांची नियुक्ती कशा पध्दतीने झाली. जर नियमीत भरती प्रक्रियेने केले असते तर यांना घेतल्या शिवाय पर्याय नाही. ज्या कागदपत्रांची तपासणी केली त्यानुषंगाने जाहिरात काढणे, परिक्षा घेणे,आरक्षण या सर्व बाबी लक्षात घेऊन त्यांची भरती झाली म्हणून बेकायदेशीर काही आहे असे मला आजीबात वाटत नाही. झालेली भरती योग्य आहे नियमीत करणे हे आमचे काम आहे. सदरील निर्णय हा पुर्वीच होणे अपेक्षीत होते निर्णय होण्यास उशीर झाला आहे. नव्याने महापालिकेत आल्यावर सदर विषय सर्वसाधारण सभेत आला त्यावेळी विषयाची माहिती नसल्यामुळे तो स्थगीत ठेवण्यात आला. मी येण्यापुर्वीच रेग्युलर करण्यात आले होते मी त्यास काही दिवसांसाठी स्थगीती दिली आता ती उठविली आहे. अधिकारी/कर्मचारी यांना रेग्युलर करणे ही आमची नैतिक जबाबदारी आहे. जे 244 दैनिक वेतनावर कर्मचारी आहेत त्यातील जे जे कर्मचारी योग्य पध्दतीने निवड झाली आहे त्यांना रेग्युलर केले व करण्यात येईल. जे बॅक डोअरनी आलेत आरक्षण नसतांना आलेत, शैक्षणिक पात्रता नसतांना घेण्यात आले करार पध्दतीने घेण्यात

आले असेल अशा कर्मचाऱ्यांना रेग्युलर करता येत नाही. जे सर्व निकष पुर्ण करून आलेले आहे त्यांना यापुर्वीच रेग्युलर करायला हवे होते. आरसीएचचे कर्मचारी करार पध्दतीने घेतलेले होते त्यांना रेग्युलाईज करावे अशा प्रकारचे धोरण त्यावेळी पासुनचे आहे. रेग्युलर करणे अत्यंत आवश्यक होते त्याप्रमाणे रेग्युलर करण्यात आले आहे. सदरील कर्मचाऱ्यांची अत्यंत गरज आहे. पुर्वीचे जे 17 अधिकारी/कर्मचारी होते ते 54(1) अन्वये निवड झाली असे 10 कर्मचारी या निकषामध्ये बसणारे होते अशाही लोकांचे आदेश काढले. प्रश्न असा आहे की, असे जे संवर्ग आहेत त्यांचे काय? महापालिका प्रशासन म्हणुन असे धोरण स्विकारले आहे की, जे जे रेग्युलर आलेत त्यांचे निकाली काढणार, सेवापुस्तकाबाबत रोस्टर,कॅडरच्या against झालेली आहे त्यांचे सेवापुस्तक केली जातील परंतु ज्यांच्यावर आरोप आहे पात्रता नसतांना दाखविलेले आहे,जन्मतारिख चुकीची दाखविलेली आहे अशा कर्मचाऱ्यांना थांबा म्हणुन सांगीतलेले आहे. सदरील इश्यु गेल्या 15 ते 20 वर्षापासुनचा आहे. आरसीएचचे कर्मचारी उपोषणास बसले होते त्यांना मा.महापौर,पदाधिकारी आणि प्रशासनाने सांगीतले होते की, जे निकष पुर्ण करतात त्यांना रेग्युलर करण्यात येईल या पार्श्वभुमिवर आरसीएचच्या कर्मचाऱ्यांना त्यानंतर इतर कर्मचाऱ्यांना रेग्युलर करण्याचे प्रशासनाचे धोरण आहे. धोरणात्मक निर्णय महापालिकेने घेतला पाहिजे आणि तो घेतलेला आहे. प्रकल्पग्रस्तांच्या जागा राहिलेल्या आहे हे पुर्वीच व्हायला पाहिजे होते. अमरावतीमध्ये असतांना 350 उमेदवारांना दोन ते तीन महिण्यात नौकऱ्या दिल्यात. प्रकल्पग्रस्तांची यादी जिल्हाधिकारी यांचेकडे केलेली असते, सिनॅरिटी लिस्ट मेंन्टेंन केलेली होती यापैकी जे जे सिनियर आहे त्यांची जातीनिहाय होते त्यांना नौकरी देणे आवश्यक होते. ते झाले नाही मा.उच्च न्यायालयाने आदेश दिला की, जिल्हयातील यादीमधुन न घेता त्याची जाहिरात करावी त्यातुन स्पर्धाकरून कोणत्या शहरातुन कोणीही येवु शकतो व स्पर्धा करू शकतो असे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिले.

श्री.प्रशांत देसरडा :मा.आयुक्तांनी सखोलपणे समजविण्याचा प्रयत्न केला. मा.आयुक्तांनी खुलासा केला की, यामध्ये कुठेही अनियमीतता नाही प्रशासनाची सेवेत कायम करण्याची नैतिक जबाबदारी आहे. मा.आयुक्तांच्या म्हणण्यानुसार सर्वसाधारण सभेने आदेशीत केले. अशा कुठलेच आदेश सर्वसाधारण सभेत झालेले नाहीत. सर्वसाधारण सभेने फक्त 40 पदांना मंजूरी दिलेली आहे. माझ्या काळात सर्वसाधारण सभेत असा कोणताही ठराव मंजूर झालेला नाही.

श्री.भगवान घडमोडे :महापालिकेच्या माध्यमातुन प्रोजेक्ट चालवेल अशी मंजूरी आहे. सर्वसाधारण सभेने सदरील कर्मचाऱ्यांना सेवेत सामावुन घ्यावे म्हणुन मंजूरी दिलेली नाही. पदांना मंजूरी दिलेली आहे. प्रशासनाने सर्वसाधारण सभेच्या ठरावाबाबत शासनाकडे चुकीची माहिती दिलेली आहे.

श्री.प्रशांत देसरडा :करारपध्दतीने नियुक्ती करू म्हणुन तत्कालिन आयुक्तांनी सभागृहात खुलासा केला होता.

श्री.भगवान घडमोडे :दैनिक वेतन कर्मचाऱ्यांचा विचार करण्यात आला नाही आरसीएच कर्मचाऱ्यांचा विचार करण्यात आला. श्री.दिलीप ठोंबरे,श्री.बोडखे यांना सेवेत कायम करण्यात आले नाही.

श्री.सतिष कटकटे :आरसीएच बाबतचा ठराव सर्वसाधारण सभेची मान्यता आहे का?

मा.सभापती :श्री.बोडखे कर्मचाऱ्यां बाबत माहिती देण्यात यावी.

श्री.रविकांत गवळी :सर्वसाधारण सभा सार्वभौम आहे सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली आहे का? सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव आणला दोन्ही वेळेस प्रस्तावास स्थगीती मिळाली एका वेळेस प्रशासनाने प्रस्ताव परत घेतला. सर्वसाधारण सभेने पुढील महिण्यांत ठेवण्यात

यावे म्हणुन सांगण्यात आले प्रशासनाने त्यांची अंमलबजावणी न करता कर्मचाऱ्यांना नियुक्ती आदेश देण्यात आले. दैनिक वेतन कर्मचाऱ्यांना कायम न करता आरसीएच कर्मचाऱ्यांचे नियुक्तीचे आदेश प्रशासनाने काढले.

श्रीमती मेहरून्निसा खान :प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

मा.सभापती :दैनिक वेतनाचे किती कर्मचारी आहेत.

सहाय्यक आयुक्त-1 :मनपाच्या आस्थापनेवर 79 कर्मचारी वर्ग तीन व वर्ग दोनचे आहेत. 67 कर्मचारी वर्ग चार मधील आहेत.

श्री.सतिष कटकटे :श्री.बोडखे,श्री.ठोकळ यांचा प्रसताव सर्वसाधारण सभेसमोर प्रशासनाने आणला होता.

मा.आयुक्त :जे नियमात बसतात अशा सर्व कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव सादर करण्यात यावे.

श्री.रविकांत गवळी :आरसीएचची जाहिरात देतांना कर्मचाऱ्यांना कायम करण्यात येईल म्हणून जाहिरातीमध्ये दिले होते का? त्यामुळे स्पर्धा झाली असती गुणवत्ताधारक अधिकारी/कर्मचारी प्राप्त झाले असते.

श्री.सतिष कटकटे :सन-2006 रोजी प्रशासनाकडुन प्रस्ताव आला होता डॉ.प्रेरणा,बेग साजेद, अय्युब बेग,सिकंदर खान,राठोड,रिता चाबुकस्वार यांचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेने रद्द केला होता. 19.01 रोजी पुन्हा सदरील ठराव आला होता प्रशासनाने नियुक्तीपत्र दिलेले आहे काय?

सहाय्यक आयुक्त-1 :सदरील प्रस्ताव आला होता सर्वसाधारण सभेने रद्द केला. पुन्हा ठेवला परत घेतला.

श्री.सतिष कटकटे :19.01 मध्ये प्रशासनाला कोणते निर्देश देण्यात आले. नियुक्तीपत्र देण्यात आले का?

सहाय्यक आयुक्त-1 :नियुक्तीपत्र देण्यात आले.

श्री.सतिष कटकटे :सर्वसाधारण सभेला काही महत्व नाही काय?

श्री.रविकांत गवळी :मा.आयुक्तांनी खुलासा केलेला आहे की, नियमात बसवुन सर्व नियुक्त्या केलेल्या आहेत.

श्री.सतिष कटकटे :सर्वसाधारण सभेने कुठला निर्णय दिला. सर्वसाधारण सभेने निर्णय दिला नसेलतर नियुक्तीपत्र देता येते का?

मा.सभापती :नियुक्तीपत्र देतांना सर्वसाधारण सभेची मान्यतेची गरज नाही.

श्री.भगवान घडमोडे :प्रशासनाने खुलासा करावा.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

श्री.रविकांत गवळी :नियुक्त्यांना सर्वसाधारण सभेची मान्यतेची गरज होती किंवा नाही.

सहाय्यक आयुक्त-1 :आस्थापना कमिटीच्या बैठकीत निर्णय झाला आहे.

मा.सभापती :सर्वसाधारण सभा सुप्रिम ॲथोरिटी आहे त्यानंतर स्थायी समिती.

श्री.सतिष कटकटे :प्रशासनाला माहिती आहे की, यानंतर सर्वसाधारण सभा होणार नाही त्यामुळे नियुक्तीपत्र देण्यात आले. सर्वसाधारण सभेचे आदेश काय आहे. निवड समितीची बैठक घेऊन नियुक्तीपत्र देण्यात यावे म्हणुन सर्वसाधारण सभेने आदेश दिलेले आहे का? दिनांक 19.01.2010 रोजी प्रशासनाने प्रस्ताव पाठवला त्यात सर्वसाधारण सभेने कोणते आदेश दिले.

मा.सभापती :सर्वसाधारण सभा झाल्यानंतर निवड समितीची बैठक झालेली आहे. त्याचाही प्रशासनाकडुन खुलासा झालेला आहे की, नियुक्तीसाठी सर्वसाधारण सभेची गरज नाही.

श्री.भगवान घडमोडे :सर्वसाधारण सभेची मान्यतेची आवश्यकता आहे किंवा नाही खुलासा करण्यात यावा.

सहाय्यक आयुक्त-1 :या पदांना कायमस्वरूपी नियुक्ती देण्यासाठी सर्वसाधारण सभेची मान्यतेची आवश्यकता नाही.

श्री.सतिष कटकटे :दोन वेळेस प्रशासनाने सर्वसाधारण सभेकडे प्रस्ताव पाठविला आहे.

श्रीमती मेहरून्निसा खान :सर्वसाधारण सभेची मान्यतेची आवश्यकता नसतांना प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे का पाठविण्यात आला.

| | |
|---|---|
| सहाय्यक आयुक्त-1 | :सर्वसाधारण सभेने निर्णय घेतलेला आहे की, सर्व पुर्तता करून सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात यावा. 19/1 ला ठेवले, पत्र देऊन परत घेतले. |
| मा.सभापती | :प्रस्ताव पाठविण्यात आला व पुन्हा परत घेण्यात आला. |
| श्री.प्रशांत देसरडा | :दिनांक 28.07 चे शासनास पत्र पाठविण्यांत आले त्यात संदर्भ टाकण्यात आले आहे औरंगाबाद मनपा सर्वसाधारण सभा दिनांक 11.01.2007. |
| श्री.सतिष कटकटे | :सर्वसाधारण सभेपुढे किती जणांचा नियुक्तीचा प्रस्ताव आणण्यात आला होता. |
| मा.सभापती | :सभा 15 मिनटांसाठी तहकूब करण्यात येते.<br>(तहकूब सभा सुरू - वेळ सायंकाळी 6.35 वाजता.) |
| सहाय्यक आयुक्त-1 | :31 कर्मचाऱ्यांचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता तो परत घेण्यात आला. |
| श्री.रविकांत गवळी | :सर्वसाधारण सभेची मान्यतेची आवश्यकता नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमात तसा उल्लेख आहे का? दिनांक 25.08.2005 रोजी शासनाचे परिपत्रक आलेले आहे त्या संदर्भामध्ये 17 एप्रील 2006 रोजी मा.ना.भा.पाटील, प्रधान सचिव यांनी मा.आयुक्तांना उत्तर पाठविलेले आहे त्याचा खुलासा होणे अपेक्षीत आहे. |
| सहाय्यक आयुक्त-1 | :शासन निर्णयाच अंमलबजावणी केलेली आहे यामध्ये कुठलेही उल्लंघन झालेले नाही. |
| श्री.रविकांत गवळी | :नियुक्ती करतांना महापालिका म्हणजे काय? महापालिका म्हणजे आयुक्त का सर्वसाधारण सभा याचा खुलासा होणे अपेक्षीत आहे. |
| मा.सभापती | :खुलासा करण्यात यावा.<br>प्रशासनाच्यावतीने खुलासा करण्यात आला नाही. |
| श्री.सतिष कटकटे | : पीरगैब कब्रस्थान येथील महापालिकेच्या जागेवर खाजगी व्यक्तींनी अतिक्रमण केले आहे. |
| मा.सभापती | :प्रशासनाने खुलासा करावा. महानगरपालिकेने सदर व्यक्तीस नोटीस दिली, सुनावणी झालेली आहे. |
| उपआयुक्त(सिडको) | :25 तारखेला प्रशासनाने अतिक्रमणाबाबत कार्यक्रम आखण्यात आलेला आहे त्यानुसार कारवाई करण्यात येईल. पोलीस बंदोबस्ताच्या अडचणीमुळे अतिक्रमण काढण्यात अडथळा येत आहे. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | :प्रशासकीय अधिकारी श्री.निकम यांनी चिस्तीया कॉलनी येथील अतिक्रमण काढल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात यावे. |
| मा.सभापती | :गेल्या चार महिण्यांपासून अतिक्रमण काढण्याबाबत निर्देश देण्यात येत आहे. |
| उपआयुक्त(सिडको) | :पोलीस बंदोबस्त घेऊन कारवाई करण्यात येईल. |
| मा.सभापती | :श्री.निकम यांचे अतिक्रमण काढल्याबाबत अभिनंदन करण्यात येते. |
| श्रीमती सफिया मोमीन | :सादातनगर येथील कब्रस्थानाचे कंपाउंड वॉलचे काम सुरू करण्यात आलेले नाही. |
| मा.सभापती | :शहादतनगर येथील महानगरपालिकेची 2 एकर जमीन महानगरपालिकेच्या ताब्यात आलेली आहे. काम करण्याचे आदेश देण्यात आलेले आहे. |

## विषय क्र. ४१९ :

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, वॉर्ड क्र.३२ मो.कबाडीपुरा, बुढीलेन येथील जुन्या रस्त्यावर पुनःर्डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याचे सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अं.प.रक्कम रू.१०,००,०००/- होत आहे. सदरील काम सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात पान क्र.SCR-A-१ अ.क्र.०६ नवीन डांबरी रस्ते या लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावित आहे. त्यास मा.आयुक्त यांची मान्यता होऊन मा.स्थायी समिती विषय/ठराव क्र.१८८, दि.२४/११/२००९ अन्वये मान्यता प्राप्त झाल्यानंतर ई-टेंडरींग विभागामार्फत निविदा मागविले असता एकूण दोन निविदा विक्री झाल्या व दोन निविदा दर भरून प्राप्त झाल्या आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.आर.के.कन्स्ट्रक्शन | १८.९९% कमी दराने |
| २. | श्री.एम.ए.सिद्दीकी | १८.८६% कमी दराने |

अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.९९% कमी दराची निविदा मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांची असून ५% अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम जमा करून घेणेस आणि (Defect Libility Period) तीन वर्षासाठी राहील. या अटीवर मान्यता दिली आहे.

करीता मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांची १८.९९% कमी दराची निविदा मंजुरीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.३२ मो.कबाडीपुरा, बुढीलेन येथील जुन्या रस्त्यावर पुनःर्डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अं.प.दरापेक्षा १८.९९% कमी दराची मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२० :**

कार्यकारी अभियंता, वॉर्ड ब आणि क यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.२६ अंतर्गत एन-७ भागातील त्रिदेवता मंदिर ते ओंकार गॅस चौकापर्यंतच्या रस्त्याची दुरूस्ती करणे या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.१३,६२,७००/- यास मा.स्थायी समिती विषय क्र.१६७ दि.१३/११/०९ अन्वये मान्यता झाली असून त्यानुसार सदरील कामासाठी निविदा मागविण्यात आली असता एकुण पाच निविदा प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | एम.ए.सिद्दीकी | २८.८७% कमी |
| २. | राजेंद्रसिंग अजितसिंग | २७.२७% कमी |
| ३. | मस्कट कन्स्ट्रक्शन कंपनी | २५.९९% कमी |
| ४. | राजेश्वर कन्स्ट्रक्शन | ४.५१% कमी |
| ५. | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | १% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची म्हणजेच अं.प.दरापेक्षा २८.८७% कमी दराची एम.ए.सिद्दीकी यांची निविदा असून निविदेस मा.आयुक्त यांची दि.२६.१.२०१० नुसार मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार सदरील कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची अं.प.दरापेक्षा २८.८७% कमी दराची एम.ए.सिद्दीकी यांची निविदा विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.२६ अंतर्गत एन-७ भागातील त्रिदेवता मंदिर ते ओंकार गॅस चौकापर्यंतच्या रस्त्याची दुरूस्ती करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा २८.८७% कमी दराची एम. ए. सिद्दीकी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२१ :**

कार्यकारी अभियंता (ई व फ), महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, सिंधी कॉलनी अंतर्गत रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.११,९९,६५०/- च्या अंदाजपत्रकास ठराव क्र.३०० दि.६.१.२०१० अन्वये मा.स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली असून सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण तीन निविदा विक्री झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

१. श्री.एम.ए.सिद्यीकी ०.१०% कमी
२. मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन ५.००% जास्त

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी श्री.एम.ए.सिद्यीकी यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी असे आहेत.

तरी श्री.एम.ए.सिद्यीकी यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराचे निविदापत्रक मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिंधी कॉलनी अंतर्गत रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा ०.१०% कमी दराची श्री.एम.ए.सिद्यीकी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**संवाद :**

मा. सभापती : प्रशासनाचे ऐनवेळचे विषय वाचुन दाखविण्यात यावे.

**विषय क्र. ४२२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.१२ जयभिमनगर आसेफिया कॉलनी येथे पुनःर्डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां. खात्याचे सन २००८-०९ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रू.१५,००,०००/- होत आहे. सदरील काम सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात पुनःर्डांबरीकरण (Resurfacing) करणे या लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावित आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांची मान्यता होऊन मा.स्थायी समिती ठराव क्र.१८६ दि.२४/११/२००९ अन्वये मान्यता प्राप्त झाल्यानंतर ई-टेंडरींग विभागामार्फत निविदा मागविले असता एकूण दोन निविदा विक्री झाल्या व दोन निविदा दर भरून प्राप्त झाल्या आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

१. मे.आर.के. कन्स्ट्रक्शन १६.९९% कमी दराने
२. श्री.एम.ए.सिद्यीकी अंदाजपत्रकीय दराने

अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.९९% कमी दराची निविदा मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांची असून ५% अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम जमा करून घेणेस आणि (Defect Libility) तीन वर्षासाठी राहील या अटीवर मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिली आहे.

करिता मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांची १६.९९% कमी दराची निविदा मंजुरीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.१२ जयभिमनगर आसेफिया कॉलनी येथे पुनःर्डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा १६.९९% कमी दराची मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२३ :**

कार्यकारी अभियंता (ई व फ), महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, सहकारनगर ते दशमेशनगर कॉंक्रीट रस्ते तयार करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.३९,९५,४००/- च्या अंदाजपत्रकास ठराव क्र.८५४ दिनांक २१.१२.२००९ अन्वये मा.सर्वसाधारण सभेची मंजुरी प्राप्त झाली असुन सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण सात निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत पाच निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.चंद्राम एन. आशन्ना | २६.०० % कमी दर |
| २. | मे.अरबाज कन्स्ट्रक्शन | १८.८६% कमी दर |
| ३. | मे.आर.के.कन्स्ट्रक्शन | १७.९९% कमी दर |
| ४. | मे.मोना कन्स्ट्रक्शन | १७.९१% कमी दर |
| ५. | मे.हायवे कन्स्ट्रक्शन | १०.०९% कमी दर |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी श्री.चंद्राम एन.आशन्ना यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा २६.००% कमी असे आहेत. तरी श्री.चंद्राम एन.आशन्ना यांचे अं.प.दरापेक्षा २६% कमी दराचे निविदापत्रक मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सहकारनगर ते दशमेशनगर कॉंक्रीट रस्ते तयार करणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६.००% कमी दराची श्री.चंद्राम एन.आशन्ना यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात ९ मोठे नाले तसेच अनेक छोटे-छोटे नाले असून येथे जमलेल्या पाण्यातील डास उत्पत्ती ठिकाणांवर अळीनाशक/किटकनाशक औषध फवारणी करण्याकरीता फिरते फवारणी यंत्र (Tractor mounted) द्वारे फवारणी करण्याकरीता खाजगी निविदाधारकांकडून निविदा मागविण्यात आल्या असता एकुण १२ निविदा भरून प्राप्त झाली. त्यापैकी फक्त ३ निविदा धारकांनी निविदेच्या अटी व शर्ती पुर्ण केल्याने त्यांच्या दरपत्रकातील दराचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. वैभव पेस्ट कंट्रोल | - | रू.१२७७.७७ प्रति दिन |
| २. सिटी गार्ड | - | रू.१५९५/- प्रति दिन |
| ३. मे.अविनाश शेळके पेस्ट कंट्रोल | - | दरपत्रक भरले नाही. |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर वैभव पेस्ट कंट्रोल रू.१२७७.७७ प्रति दिन, प्रति फिरते फवारणी यंत्र (Tractor mounted) असे ३ फिरते फवारणी यंत्र (Tractor mounted) तीन वर्षा करीता मंजूर दराप्रमाणे देण्यास प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

मा.सभापती : विषय क्रमांक 424 मध्ये फवारणी यंत्र तीन वर्षासाठी आहे किंवा एक वर्षासाठी आहे खुलासा करण्यात यावा.

आरोग्य वै.अधिकारी :औरंगाबाद शहरामध्ये गेल्या वर्षापासून टॅक्टरच्या सहयाने फवारणी करीत आहे. आजपर्यंत मा.आयुक्तांच्या अधिकारात आदेश देण्यात येत होते परंतु मा.आयुक्तांनी टेंडर काढवे म्हणुन सुचविण्यात आले. त्या पध्दतीमध्ये टेंडर काढण्यात आले. पुर्वी

दोन ते तीन महिण्यांचे आदेश दिले जात होते आता टेंडर काढुन रेग्युलाईज करायचे आहे. 1800 रूपये रोज याप्रमाणे देण्यात येत होते.

श्रीमती मेहरून्निसा खान : शहरात ट्रॅक्टरने फवारणी कुठेच नाही.

मा.सभापती : फवारणी बाबतची यंत्रणा कोणकोणत्या भागात फिरते याबाबत लेखी माहिती देण्यात यावी. विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रातील नाल्यात जमलेल्या पाण्यातील डास उत्पत्ती ठिकाणांवर अळीनाशक/किटकनाशक औषध फवारणीकरीता फिरते फवारणी यंत्र (Tractor mounted) द्वारे फवारणी करण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक वैभव पेस्ट कंट्रोल यांचे मार्फत ३ फिरते फवारणी यंत्र (Tractor mounted) द्वारे तीन वर्षा करीता रू.१२७७.७७ प्रति दिन/प्रती फिरते फवारणी यंत्र या दराप्रमाणे करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ४२५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२८ नेहरूनगर अंतर्गत न्यु एस.टी. कॉलनी येथे १००, १५० व २०० मी.मी. व्यासाची डीआयके-७ जलवाहिनी टाकावयाचे प्रस्तावित आहे.

या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे दरसुची सन २००८-०९ नुसार रक्कम रू.११,९५,०१८/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. मा.स्थायी समिती विषय क्र.३३७ दि.२९/१/२०१० अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार ई-टेंडरींग मार्फत निविदा मागविली असता त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. अब्दुल खालेद अब्दुल रहेमान | - | ८.७०% कमी दराने |
| २. नुर कन्स्ट्रक्शन | - | २.२०% कमी दराने |

उपरोक्त प्राप्त निविदामध्ये सर्वात कमी दराची निविदा श्री.अब्दुल खालेद अब्दुल रहेमान यांची असून अं.प.दरापेक्षा ८.७०% कमी दराने आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांची मान्यता झालेली आहे.

तरी वॉर्ड क्र.२८ नेहरूनगर अंतर्गत न्यु एस.टी. कॉलनी येथे १००, १५० व २०० मी.मी. व्यासाची डीआयके-७ जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी श्री.अब्दुल खालेद अब्दुल रहेमान यांची अं.प.दरापेक्षा ८.७०% कमी दराची निविदा स्विकृती मान्यतेबाबत तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार वॉर्ड क्र.२८ नेहरूनगर अंतर्गत न्यु एस.टी. कॉलनी येथे १००, १५० व २०० मी.मी. व्यासाची डीआयके-७ जलवाहिनी टाकणेचे काम दुसरे कमी दराचे निविदाधारक नुर कन्स्ट्रक्शन यांच्यामार्फत प्रथम क्रमांकचे कमी दरानुसार म्हणजेच अं.प.दरापेक्षा ८.७०% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.३३ गुलमंडी भागात विविध ठिकाणी कॉंक्रेटींग करणे व पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामासाठी सन २००८-०९ च्या जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रू.१४,८०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदरील कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता, एकूण चार निविदा विक्री झाल्या व दोन निविदा दर भरून प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. गरूड कन्स्ट्रक्शन | २०.४४ % कमी दर |
| २. | मे.कासलीवाल कन्स्ट्रक्शन | १५.८७% कमी दर |

उपरोक्त पैकी सर्वात कमी दराची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.४४% कमी दराची मे.गरूड कन्स्ट्रक्शन यांची आहे. सदरील निविदा दरास प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली आहे.

तरी मे.गरूड कन्स्ट्रक्शन यांची २०.४४% कमी दराची निविदा मंजुरीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.३३ गुलमंडी भागात विविध ठिकाणी कॉंक्रेटींग करणे व पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.४४% कमी दराची मे.गरूड कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ४२७ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महिला व बाल कल्याण समिती सभा दि.२६.८.२००९ विषय क्र. ८ अन्वये औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील विद्यार्थीनींना शैक्षणिक मदत होण्याच्या दृष्टीने दुचाकी सायकल देणे बाबतच्या आंजित खर्च रू.१५ लाख खर्चाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

स्थायी समिती सभा दि.६-१-२०१० विषय क्र.३०१ अन्वये २ जाने. १९९२ च्या शासन निर्णयानुसार खरेदी प्रक्रियेच्या अंदाजित खर्चास मान्यता देण्यात आली.

त्यानुसार दि.१.२.२०१० रोजी वृत्तपत्रातून जाहीर निविदा प्रसिध्द करणेत आली. एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या. तीनही निविदाधारकांनी सादर केलेल्या नमुन्यांची तांत्रिक तपासणी आय.टी.आय. औरंगाबाद यांचेकडून करून घेण्यात आली. तांत्रिक तपासणी अहवालानुसार तीनही नमुना निविदेतील तांत्रिक बाबींची पुर्तता करणार आहेत. त्यांनी सादर केलेले दर खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जिगर ट्रेडर्स | -अॅव्हॉन | रू.३१००/- प्र.नग |
| २. | अभय ट्रेडर्स | -अॅव्हॉन | रू.२९८५/- प्र.नग |
| ३. | क्रिश इंटरनॅशनल | -अॅव्हॉन | रू.२९९०/- प्र.नग |

तुलनात्मकदृष्ट्या अभय ट्रेडर्स यांचे दर कमी आहेत. तथापि याबाबत पुरवठा धारकांनी वाटाघाटी केल्या. त्यानुसार रू.२९८०/- या दरामध्ये पुरवठा करण्यास संबंधीत पुरवठाधारकांनी संमती दर्शविली आहे. त्यानुसार सदरील दर मान्यतेस्तव सादर. एकूण ४३४ नग (४३४+१८ एडस् बाधीत कुटुंबातील विद्यार्थी) खरेदीस येणाऱ्या रक्कम रू.१२,९३,३२०/- (रूपये बारा लाख त्र्याण्णव हजार तीनशे वीस) च्या खर्चाचा प्रस्ताव स्थायी समितीचे मान्यतेस्तव सादर. तसेच महिला व बाल कल्याण समितीने केलेल्या शिफारशीनुसार एड्स बाधीत कुटुंबातील विद्यार्थीनींना १००% अनुदान तत्वावर दुचाकी सायकल देणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीचे मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील विद्यार्थीनींना शैक्षणिक मदत होण्याच्या दृष्टीने दुचाकी सायकल देणेसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे रू.२९८०/- प्रति नग या दरानुसार अभय ट्रेडर्स यांचेकडून दुचाकी सायकल खरेदीस तसेच एकूण ४३४ नग (४३४+१८ एडस् बाधीत कुटुंबातील विद्यार्थी) खरेदीस येणाऱ्या रक्कम रू.१२,९३,३२०/- (रूपये बारा लाख त्र्याण्णव

हजार तीनशे वीस) च्या खर्चास आणि एड्स बाधीत कुटुंबातील विद्यार्थीनींना १००% अनुदान तत्वावर दुचाकी सायकल देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९५ पदमपुरा अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रू.११,९७,७००/- च्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा दि.२२.११.०९ क्र.२५० नुसार मान्यता प्राप्त आहे. सदर कामाचे निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण २ निविदा विक्री होऊन स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत २ निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-निविदा विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा ०.५% कमी दराने |
| २. | मे. एम. ए. सिद्यीकी | अं.प.दरापेक्षा ८.८६% जास्त दराने |

उपरोक्त प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा ०.५% कमी दराची आहे. मा.आयुक्त महोदय यांनी मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणेबाबत शिफारस केली आहे.

तरी मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा ०.५% कमी दराची निविदा मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.९५ पदमपुरा अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा ०.५% कमी दराची मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२९ :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र.७७ मध्ये विविध ठिकाणी डांबरीकरण करणेच्या कामासाठी मा.स्थायी समिती ठराव क्र.२९८ दि.६.१.२०१० अन्वये रक्कम रू.१९,९६,७००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त असून सदर कामाच्या बी-१ निविदा मागविल्या असता एकूण ०२ निविदा प्राप्त झाल्या. त्या दि.१.२.२०१० रोजी उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.आर.के.कन्स्ट्रक्शन | १.७५% कमी दराने |
| २. | मे. मस्कट कन्स्ट्रक्शन | ४.१५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा १.७५% कमी दराऐवजी ७% कमी दराने मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस मा.आयुक्तांनी दि.२२.२.२०१० रोजी मान्यता दिलेली आहे.

सबब सदर कामासाठी अं.प.दरापेक्षा ७.००% कमी दराची मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.७७ मध्ये विविध ठिकाणी डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा ७.००% कमी दराची मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २००९/प्र.क्र.-१४८/नवि-२६, मंत्रालय, मुंबई दिनांक २२.०१.२०१० अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ अ (१) अन्वये बृहन्मुंबई वगळून राज्यातील महानगरपालिका सदस्यांचे मानधन रू.७५००/- प्रतिमाह करण्यात आलेले असून सदर शासन निर्णय निर्गमित झालेल्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक २२.०१.२०१० पासून रू.७५००/- प्रतिमाह मानधन अनुज्ञेय होईल. सभा भत्त्यात कोणतेही वाढ केलेली नाही. सभाभत्ता पुर्वी प्रमाणेच कायम ठेवण्यात आलेला आहे.

तरी औरंगाबाद महानगरपालिकेचे सर्व पालिका सदस्यांना मानधन रू.४०००/- ऐवजी रू.७५००/- प्रतिमाह दिनांक २२.०१.२०१० पासून वाढ करणे व वाढीव दराने अदा करणेसाठी प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवण्यासाठी मा.आयुक्तांची शिफारस आहे. करिता प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २००९/प्र.क्र.-१४८/नवि-२६, मंत्रालय, मुंबई दिनांक २२.०१.२०१० अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ अ (१) नुसार औरंगाबाद महानगरपालिकेचे सर्व पालिका सदस्यांना मानधन रू.४०००/- ऐवजी रू.७५००/- प्रतिमाह दिनांक २२.०१.२०१० पासून वाढ करणे व वाढीव दराने अदा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३१ :**

संचालक, प्राणी संग्रहालय यांनी प्रस्ताव सादर केला की, सन २०१०-११ या एका आर्थिक वर्षा करीता प्राणी संग्रहालयातील हिंस्त्र प्राण्यांकरिता लागणारे बीफ खाद्य खरेदीसाठी ई-टेंडर द्वारा निविदा मागविण्यात आल्या असता एकूण चार निविदांची विक्री झाली असून एकूण चार भरलेल्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | दर प्रतिकिलो रूपये |
|---|---|---|
| १. | श्री.अब्दुल हमीद कुरैशी | ९०.०० |
| २. | श्री.गफुरमिया कुरैशी | ७०.५० |
| ३. | श्री.फेरोज खान रहेमान खान | ६५.०० |
| ४. | श्री.अब्दुल हारूण कुरैशी | ६०.०० |

चार निविदा धारकांपैकी तुलनात्मकदृष्टीने श्री.अब्दुल हारूण कुरैशी यांचे दर रूपये ६०.०० प्रति किलो असून निविदा धारकाशी चर्चा केल्यानंतर त्यांनी रू.५५/- प्र.कि. दराने बीफचा पुरवठा करणेस संमती दिलेली आहे व या दरास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

प्राणी संग्रहालयात वाघ, सिंह, कोल्हे, लांडगे, तरस, मगर, उदबिल्ले असे एकूण २८ मांसाहारी प्राणी असून प्राप्त सर्वात कमी दर ५५.०० प्र.कि. या दरानुसार वार्षिक खर्च रू.३३,७४,१४०/- अपेक्षीत आहे.

तुलनात्मक दरानुसार बीफ खरेदीसाठी श्री.अब्दुल हमीद कुरैशी यांचे दर रू.५५.०० प्र.कि. विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

मा.सभापती : बीफ खरेदी बाबतचा प्रस्तावाचा प्रशासनाने खुलासा करावा.

पशुसंवर्धन अधिकारी : गेल्या वर्षी मीट सप्लायचा रेट 37 रूपये किलो होता.यावर्षी ई टेंडरिंगद्वारा निवीदा मागविल्या असता 60, 65, 75, 90 रूपये किलो दर आलेत. सर्वात कमी निवीदा 60 रूपयाचे असल्याने त्यास वाटाघाटीसाठी लेखाधिकाऱ्यांच्या दालनात बोलावुन कमी करण्याचे प्रयत्न केले. त्यांनी 55 रूपये किलो दराने देण्यास तयारी दर्शविलेली आहे. सध्या मार्केटमध्ये मटनाचे भाव वाढलेले आहे.

मा.सभापती : स.सदस्य श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर यांनी ई टेंडरींगद्वारे कशापध्दतीने मॅनेज केले जातो याबाबतचा खुलासा पत्रकार परिषद घेऊन करण्यात आला.त्यामुळे महानगरपालिकेचे दिड कोटी रूपये वाचविण्यात आले. सदरचा प्रस्ताव सर्वानुमताने रद्द करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव रद्द करण्यात आला. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. ४३२ :**

कार्यकारी अभियंता (ई व फ) महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, वेदांतनगर येथील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.९,९०,९९०/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यानुसार निविदापत्रके मागवून सदरील काम श्री.प्रभाकर मोहिते यांचेकडून अं.प.दरापेक्षा ५% कमी दराने करून घेण्यासही मान्यता प्राप्त झालेली आहे. मा.आमदार यांनी सदर काम करतेवेळी तेथे कंपाऊंड वॉल लगत इटालियन पेव्हर ब्लॉक बसविणे इ. कामे सुचविली आहेत. त्यामुळे सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार अतिरिक्त कामाकरीता७,५४,०३९/- इतका अतिरिक्त खर्च लागणार आहे. करीता एकुण रक्कम रू.१७,४५,०३५/- चे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यास मान्यता प्राप्त झालेली आहे. तसेच वाढीव ७५४०३९/- चे काम याच कामाचे ठेकेदार श्री.प्रभाकर मोहिते यांचेकडून अं.प.दरापेक्षा १०% कमी दराने करून घेण्यास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

तरी सुधारीत रक्कम रू.१७,४५,०३५/- चे अंदाजपत्रक तसेच रक्कम रू.७५४०३९/- चे वाढीव काम याच कामाचे कंत्राटदार श्री.प्रभाकर मोहिते यांचेकडून अं.प.दरापेक्षा १०% कमी दराने करून घेणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वेदांतनगर येथील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे या कामा अंतर्गत कंपाऊंड वॉल लगत इटालियन पेव्हर ब्लॉक बसविणे इ. अतिरिक्त कामामुळे र.रू.७५४०३९/- च्या वाढीव खर्चास तसेच वाढीव काम याच कामाचे कंत्राटदार श्री.प्रभाकर मोहिते यांचेकडून अं.प.दरापेक्षा १०% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

श्रीमती मेहरून्निसा खान : सर्व प्रशासकीय प्रस्ताव मंजूर करण्यात यावे.

श्रीमती सफिया मोमीन :आदिनाथ कंन्स्ट्रक्शनचे सर्व विषय नामंजूर करण्यात यावे. माझ्या वार्डात बरोबर कामे केली जात नाही. शेडयुल बी च्या अंतर्गत कामे केली जात नाही.

श्री.प्रशांत देसरडा :वार्ड क्रमांक 28 मध्ये पाण्याच्या पाईपलाईनचा प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती :वार्ड क्रमांक 28मध्ये पाईपलाईनचा 12 लाखाचा प्रशासकीय प्रस्ताव होता दोन गुत्तेदारांच्या आपसामधील भांडणामध्ये काम बंद पडले.

श्री.प्रशांत देसरडा :गुत्तेदार कामे करीत नाही तर प्रशासनाचे त्यावर नियंत्रण असायला पाहिजे. ब्लॅक लिस्ट करण्यात यावे.

श्रीमती मेहरून्निसा खान :संबधीत गुत्तेदार काम करीत नसेलतर दोन क्रमांकाच्या गुत्तेदाराला कामे देण्यात यावी.

मा.सभापती :याप्रकरणी नुर कंन्स्ट्रक्शन कंपणी यांनी 7.80 या दराने काम करण्यास मंजूरी देण्यात येते. खालेद कन्स्ट्रक्शन यांना दिलेले काम रद्द करण्यात येते.

श्री.प्रशांत देसरडा :गांधी नगर येथील पाणीपुरवठयाचे काम रद्द करण्यात आले होते तो विषय मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती :मंजूर करण्यात येतो.

नगर सचिव :वार्ड क्रमांक 95 पद्मपुरा येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करण्याचा प्रस्ताव वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती :ऐनवेळी आलेले प्रशासकीय प्रस्ताव आणि स.सदस्यांचे प्रस्ताव मंजूर करण्यात येतात.

**विषय क्र. ४३३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, राममंदिर ते आझाद चौक मुख्य रस्त्यामधील डीआय जलवाहिनी स्थलांतरीत करणे व ३०० मी.मी. व्यासाची डी.आय. जलवाहिनी टाकण्याचे कामासाठी रक्कम रू.२८,७९,६५०/- च्या अंदाजपत्रकास दिनांक २१/१२/२००९ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.७८२ अन्वये मान्यता दिलेली आहे. मनपा निवडणूकीची आचारसंहिता लक्षात घेता सदरचे काम तातडीने करण्यासाठी मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये अं.प.दरावर तातडीने करून घेण्याच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : प्रल्हाद निमगांवकर अनुमोदक : भगवान घडमोडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे राममंदिर ते आझाद चौक मुख्य रस्त्यामधील डीआय जलवाहिनी स्थलांतरीत करणे व ३०० मी.मी. व्यासाची डी.आय. जलवाहिनी टाकण्याचे कामासाठी रक्कम रू.२८,७९,६५०/- च्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.७८२ अन्वये मान्यतादिल्यानुसार तसेच मनपा निवडणूकीची आचारसंहिता लक्षात घेता सदरचे काम तातडीने करण्यासाठी मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१२ अंतर्गत दैनंदिन व अत्यावश्यक किरकोळ फुटकळ कामे करणे प्रस्तावित असून या कामाकरीता मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.७१३ दि.७.११.२००९ अन्वये निधी उपलब्ध करून दिलेला आहे. सदरचे काम तातडीने करण्यासाठी मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये अं.प.दरावर तातडीने करून घेण्याच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्रीमती मेहरून्नीसा खान अनुमोदक : श्री.सातीश कटकटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.१२ अंतर्गत दैनंदिन व अत्यावश्यक किरकोळ फुटकळ कामे करणे प्रस्तावित असून या कामाकरीता मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.७१३ दि.७.११.२००९ अन्वये उपलब्ध करून दिलेल्या तरतुदीच्या अधीन राहून सदरील काम तातडीने करण्यासाठी मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये अं.प.दरावर

तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियामाप्रमाणे कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या टाऊन हॉल येथील कार्यालयात कामानिमित्त अनेक नागरीक येत असतात. त्याशिवाय कार्यालयात कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी अद्यावत अशी कॅन्टीन असणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने टाऊन हॉल परिसरात कॅन्टीन चालु करण्यासाठी सचिन मिश्राजी बोरा, राहणार बेगमपुरा यांना ३०X४० ची जागा अथवा खुली जागा स्वखर्चाने बांधुन घेण्यासाठी दरमहा रू.१५००/- (अक्षरी रूपये एक हजार पाचशे) ने ३३ वर्षाच्या लिजवर देण्यात येणे योग्य राहील. करीता प्रस्ताव स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : प्रशांत देसरडा अनुमोदक : श्रीमती मेहरून्नीसा खान

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या टाऊन हॉल येथील कार्यालयात नागरीक, अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी अद्यावत अशी कॅन्टीन असणे आवश्यक असल्याने टाऊन हॉल परिसरात कॅन्टीन चालु करण्यासाठी सचिन मिश्राजी बोरा, राहणार बेगमपुरा यांना ३०X४० ची जागा अथवा खुली जागा स्वखर्चाने बांधुन घेण्यासाठी दरमहा रू.१५००/- (अक्षरी रूपये एक हजार पाचशे) ने ३३ वर्षाच्या लिजवर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जवाहर कॉलनी शाळेच्या स्लॅब दुरूस्त करणे व इतर किरकोळ कामे करण्याकरीता रक्कम रू.७,७१,०००/- चे अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त झालेली असून त्यामधुन ७,३३,७२४/- इतक्या रक्कमेचे काम श्री.महेश राजपूत, कंत्राटदार यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यात आलेले आहे.

सदर वॉर्डाच्या स.नगरसेविका यांनी या शाळेत खोल्यामधील फरशी काढून नविन बसविणे तसेच इतर किरकोळ दुरूस्ती करण्याची मागणी केली आहे व या कामाकरीता मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.४६० दि.२.३.२००९ अन्वये रक्कम रू.५.०० लक्ष ची तरतुद उपलब्ध करून दिली आहे.

तरी वरीलप्रमाणे वाढीव काम करण्याकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसूचीनुसार रक्कम रू.४,९९,९५९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. मूळ अंदाजपत्रक रक्कम रू.७,३३,७२४/- व वाढीव कामाकरीता तयार करण्यात आलेले रक्कम रू.४,९९,९५९/- असे एकुण रू.१२,७०,९५९/- चे अंदाजपत्रक होत आहे.

तरी वाढीव कामाकरीता तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकासह रक्कम रू.१२,७०,९५९/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा तसेच सदरील काम याच कामाचे कंत्राटदार श्री.महेश राजपुत यांच्याकडून मंजूर दराने म्हणजेच अंदाजपत्रकीय दराने करून घेण्याचे मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जवाहर कॉलनी शाळेच्या स्लॅब दुरूस्त करणे व इतर किरकोळ कामांतर्गत या शाळेत खोल्यामधील फरशी काढून नविन बसविणे तसेच इतर किरकोळ दुरूस्ती करण्याकरीता वाढीव कामाकरीता तयार करण्यात आलेले रक्कम रू.४,९९,९५९/- चे अंदाजपत्रकासह रक्कम रू.१२,७०,९५९/- चे सुधारीत अंदाजपत्रकास तसेच सदरील काम याच

कामाचे कंत्राटदार श्री.महेश राजपुत यांच्याकडून मंजूर दराने म्हणजेच अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२८ नेहरूनगर अंतर्गत विविध गल्ल्यामध्ये जी.आय.पोल बसविणे व विविध ठिकाणी थ्री सेट बसविणे ही कामे प्रस्तावित असून या कामाकरीता प्रत्येकी २.५० लक्षचे दोन अंदाजपत्रक असून मनपा निवडणूकीची आचारसंहिता लागण्याची शक्यता ध्यानात घेता सदरची कामे तातडीने करण्यासाठी मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये अं.प.दरावर तातडीने करून घेण्याच्या मान्यतेस्तव सादर.

१. वॉर्ड क्र.२८ नेहरूनगर मधील विविध गल्ल्यामध्ये जी.आय.पोल बसविणे -२.५० लक्ष

२. नेहरूनगर अंतर्गत विविध ठिकाणी थ्री सेट बसविणे - २.५० लक्ष

सुचक : प्रशांत देसरडा    अनुमोदक : सौ.मोमीन सफिया फिरदौस

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.२८ नेहरूनगर अंतर्गत विविध गल्ल्यामध्ये जी.आय.पोल बसविणे व विविध ठिकाणी थ्री सेट बसविणे या कामाकरीता तयान केलेल्या अंदाजपत्रकास अनुसरून मनपा निवडणूकीची आचारसंहिता लागण्याची शक्यता ध्यानात घेता सदरचे काम तातडीने करण्यासाठी मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियामप्रमाणे कार्यवाही करावी.

१. वॉर्ड क्र.२८ नेहरूनगर मधील विविध गल्ल्यामध्ये जी.आय.पोल बसविणे -२.५० लक्ष

२. नेहरूनगर अंतर्गत विविध ठिकाणी थ्री सेट बसविणे - २.५० लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.४९ मध्ये मनपाच्या उद्यानात खेळणी नसल्याने लहान मुलांना खेळण्यास गैरसोय होत आहे. या उद्यानात विविध ठिकाणी खेळणी बसविण्याचे काम मंजूर करून सदरील कामास येणारे खर्चास ५ (२) (२) अन्वये मंजुर करून काम त्वरीत करणेसाठी प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : भगवान घडमोडे    अनुमोदक : मोमीन सफिया फिरदौस

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.४९ मध्ये मनपाच्या उद्यानात खेळणी नसल्याने लहान मुलांसाठी या उद्यानात विविध ठिकाणी खेळणी बसविण्याचे कामास लागणाऱ्या खर्चास व सदरील काम तातडीने करण्यासाठी मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३९ :**

कार्यकारी अभियंता (ई व फ), महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, चेतक घोडा ते त्रिमुर्ती चौक मुख्य रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.२९,९९,३५१/- च्या अंदाजपत्रकास ठराव क्र.६२४ अन्वये मा.सर्वसाधारण सभेची मंजुरी प्राप्त झाली असून सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण सहा निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत सदरील सहा निविदा दर भरून प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.राजेंद्रसिंग अजितसिंग | ३३.९९% कमी दर |
| २. | श्री.के.बी.पाथ्रीकर | ३१.५०% कमी दर |
| ३. | श्री.एम.ए.सिद्यकी | २६.९९% कमी दर |
| ४. | मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी | २३.१२% कमी दर |
| ५. | मे.आर.के.कन्स्ट्रक्शन | २०.९९% कमी दर |
| ६. | मे.राजेश्वर कन्स्ट्रक्शन | १८.९१% कमी दर |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी श्री.राजेंद्रसिंग अजितसिंग यांचे निविदांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा ३३.९९% कमी असे आहेत.

तरी श्री.राजेंद्रसिंग अजितसिंग यांचे अं.प.दरापेक्षा ३३.९९% कमी दराचे निविदापत्रक मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चेतक घोडा ते त्रिमुर्ती चौक मुख्य रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा ३३.९९% कमी दराची श्री.राजेंद्रसिंग अजितसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्र. ४४० :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७६ अंतर्गत सुशोभिकरण करणेच्या कामाचे र.रू.४,९४,२५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून सदर काम त्वरीत करणे आवश्यक असल्याने मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम कलम ५(२)(२) नुसार उपलब्ध गुत्तेदारामार्फत अं.प.दराने सुरू करणे आवश्यक आहे. यासाठीच्या खर्चाची तरतुद मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.७७३ दि.७.११.२००९ नुसार शहर सौंदर्यीकरण नवीन कामे अंतर्गत रू.५.०० लक्ष वळती करून दिलेले आहे.

करीता वॉर्ड क्र.७६ अंतर्गत सुशोभिकरण करणेचे काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये अं.प.दरावर सुमीत कन्स्ट्रक्शन यांचेमार्फत तातडीने करून घेण्याच्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.७६ अंतर्गत सुशोभिकरण करणेच्या कामाचे र.रू.४,९४,२५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून सदर काम त्वरीत करणे आवश्यक असल्याने व मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.७७३ दि.७.११.२००९ अन्वये शहर सौंदर्यीकरण नवीन कामे अंतर्गत रू. ५.०० लक्ष वळती केल्यानुसार सदर काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये अं.प.दरावर सुमीत कन्स्ट्रक्शन यांचेमार्फत तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ४४१ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.प्रभात चव्हाण, अध्यक्ष, भारतीय बंजारा उन्नती मंडळ, औरंगाबाद यांनी मो.बसैय्येनगर येथील महानगरपालिकेचे सभागृह हॉल व्यायामशाळेसाठी भाडेतत्वावर २९ वर्षाच्या करारनाम्यावर भाड्याने घेतलेले आहे व त्यांना व्यायामशाळेचे साहित्य खरेदी करण्यासाठी शासकीय अनुदानासाठी कमीत कमी ३३ वर्षाचा करार लागत आहे.

तरी अतिरिक्त ४ वर्षाचा करारनामा करण्याच्या मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : प्रशांत देसरडा                                   अनुमोदक : सतीश कटकटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.बसैय्येनगर येथील महानगरपालिकेचे सभागृह हॉल श्री.प्रभात चव्हाण, अध्यक्ष, भारतीय बंजारा उन्नती मंडळ, औरंगाबाद यांनी व्यायामशाळेसाठी २९ वर्षाच्या करारनाम्यावर भाडेतत्वावर घेतलेले असून शासकीय अनुदानासाठी कमीत कमी ३३ वर्षाचा करार करण्याची आवश्यकता असल्याने २९ वर्षाऐवजी ३३ वर्षाचा करारनामा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४२ :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करतात की, १२ व्या वित्त आयोगाच्या निधीतील कामांसाठी प्राप्त झालेली रू. १ कोटी ४० लक्ष इतकी रक्कम एक्सीस बँकेत जमा झालेली आहे. सदरील निधी मार्च अखेर पर्यंत खर्ची पडण्याची शक्यता नसल्यामुळे उक्त रक्कम ठेव स्वरूपात ठेवल्यास या रक्कमेवर व्याज प्राप्त होवू शकेल. त्यानुसार विविध बँकांचे व्याज दर मागविण्यात आले असता ४६ ते ९० दिवसांकरीता आंध्र बँकेचे ४.२५% इतका व्याज दर सर्वात जास्त प्राप्त झालेला आहे.

करीता उक्त रक्कम आंध्र बँकेमध्ये ४६ दिवसांसाठी ४.२५% या व्याज दराने गुंतवणूक करण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे १२ व्या वित्त आयोगाच्या निधीतील कामांसाठी प्राप्त झालेली व एक्सीस बँकेत जमा झालेली रू. १ कोटी ४० लक्ष इतकी रक्कम आंध्र बँकेमध्ये ४६ दिवसांसाठी ४.२५% या व्याज दराने गुंतवणूक करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ८८ जयविश्वभारती कॉलनी अंतर्गत मुस्तफाबाद, बीड बायपास जवळ येथे पथदिव्यांची व्यवस्था करणे आवश्यक आहे. या भागातील नागरीकांची पथदिव्यांची मागणी असून या कामाकरीता मा.महापौर यांनी आपत्कालीन निधीतून रू.४.०० लक्ष निधी उपलब्ध करून दिलेला आहे. मनपा निवडणूकीची आचारसंहिता लागण्याची शक्यता ध्यानात घेता सदरची कामे तातडीने करण्यासाठी मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये अं.प.दरावर तातडीने करून घेण्याच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : सतीश कटकटे अनुमोदक : भगवान घडमोडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ८८ जयविश्वभारती कॉलनी अंतर्गत मुस्तफाबाद, बीड बायपास जवळ येथे पथदिव्यांची व्यवस्था करणे आवश्यक असून या भागातील नागरीकांची मागणी असल्याने या कामाकरीता रू.४.०० लक्ष निधीच्या उपलब्धतेस अधीन राहून मनपा निवडणूकीची आचारसंहिता लागण्याची शक्यता ध्यानात घेता सदरची कामे तातडीने करण्यासाठी मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध गुत्तेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३७ अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्यांचे पुन:डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन २००८-०९ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आले असून रू.११,६८,०००/- च्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा दि.११/२/२०१०

विषय क्र.३७६ नुसार मान्यता प्राप्त आहे. सदर कामाचे निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ३ निविदा विक्री होऊन स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत १ निविदा दर भरून प्राप्त झाली असल्याचा अहवाल ई-निविदा विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

१. मे. मस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी अं.प.दरापेक्षा ३.११% जास्त दराने

उपराक्त प्राप्त निविदा मे.मॉस्कॉअ कन्स्ट्रक्शन कंपनी यांची अं.प.दरापेक्षा ३.११% जास्त दराची आहे. मा.आयुक्त महोदय यांनी ७% कमी दरास मान्यता देवून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे.

तरी मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७% कमी दराची निविदा मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.३७ अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्यांचे पुन:र्डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार सदरील काम मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी यांचेकडून अं.प.दरापेक्षा ७% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१९ एन-७ सिडको येथे मनपा केंद्रीय प्रशाला व मनपा वाचनालय येथे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणेसाठी टाकी बांधणे नागरीकांनी व माधवी वृक्षमित्र मंडळ या सेवाभावी संस्थेने मागणी केलेली आहे. पाण्याचे टाकीची देखभाल माधवी वृक्षमित्र मंडळ ही संस्था करणार असून या कामासाठी रू.१,८९,३०३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सर्वसाधारण सभा दि.२०.२.२०१० ठराव क्र.१०२७ अन्वये आर्थिक तरतुद उपलब्ध करून दिलेली असून अत्यंत तातडीची गरज म्हणून या ठिकाणी बांधण्याचे काम त्वरीत करणे आवश्यक आहे. मनपा निवडणूकीची आचारसंहिता लागण्याची शक्यता ध्यानात घेता सदरचे काम तातडीने करण्यासाठी मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध गुत्तेदारामार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : रविकांत गवळी अनुमोदक : नारायण कुचे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.१९ एन-७ सिडको येथे मनपा केंद्रीय प्रशाला व मनपा वाचनालय येथे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणेसाठी टाकी अत्यंत बांधण्याचे काम त्वरीत करणे असल्याने व मनपा निवडणूकीची आचारसंहिता लागण्याची शक्यता ध्यानात घेता सदरचे काम तातडीने करण्यासाठी मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध गुत्तेदारामार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियामाप्रमाणे कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ०४ येथे जटवाडा रोडवरील होनाजी नगर ही वसाहत १००% अधिकृत वसाहत असून १० वर्षापासून तेथील रहिवाश्यांनी विकास कर भरलेला आहे. त्यांना अद्यापपर्यंत कोणत्याही मुलभूत सुविधा मिळालेल्या नाहीत. अत्यंत तातडीची गरज म्हणून या ठिकाणी २५० मी.मी. आरसीसी व चीनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणे अत्यंत गरजेचे आहे. करीता मा.सर्वसाधारण सभा दि.२०.२.२०१० च्या ठराव क्र.९९८ नुसार तरतुद रू.४.५० लक्ष वळती करण्यात आलेली आहे. मनपा निवडणूकीची आचारसंहिता लागण्याची शक्यता ध्यानात घेता सदरची कामे

तातडीने करण्यासाठी मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये अं.प.दरावर तातडीने करून घेण्याच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : रविकांत गवळी    अनुमोदक : नारायण कुचे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ०४ येथे जटवाडा रोडवरील होनाजी नगर येथे अत्यंत तातडीची गरज म्हणून या ठिकाणी २५० मी.मी. आरसीसी व चीनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेकरीता मा.सर्वसाधारण सभा दि.२०.२.२०१० च्या ठराव क्र.९९८ अन्वये रू.४.५० लक्ष वळती करण्यात आलेल्या तरतुदीस अधिन राहून, मनपा निवडणूकीची आचारसंहिता लागण्याची शक्यता ध्यानात घेता सदरची काम तातडीन करण्यासाठी मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारामार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियामाप्रमाणे कार्यवाही करावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४७ :**

मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे मंजुरीनुसार उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, श्री.वरखेडेश्वरी चॅरीटेबल ट्रस्ट, औरंगाबाद यांनी दि.१.१२.२००९ रोजी विनंती अर्ज देवून महानगरपालिकेच्या मालकीचे मो.जयहिंद कॉलनी येथील सिटी मार्बल मधील हॉल भाडेपट्ट्यावर मिळणे बाबत विनंती अर्ज केला आहे.

न.भु.क्र.१७८०४ सिटी मार्बलच्या इमारती मधील पहिल्या मजल्यावरील हॉलचे क्षेत्रफळ ११८.८४५ चौ.मी. साठी सिध्द शिघ्र गणकानुसार प्रति चौ.मी. प्रति माह रक्कम रू.२०९/- (प्रती माह भाडे रू.२४,८३९/-, प्रती वर्ष भाडे रू.२,९८,०६८/-) आकारणे योग्य व मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम, सेवा शुल्क रू.५/- प्रती चौ.मी. प्रती माह व अकृषी कर आकारून महानगरपालिकेच्या प्रचलित अटी शर्तीनुसार भाडेपट्ट्याने देणे योग्य.

करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.रविकांत गवळी : गेल्या बैठकांमध्ये महानगरपालिकेच्या मालकीच्या इमारती भाडेतत्वावर देण्याकरीता दहा ते बारा वेळा निविदा काढण्यात आलेली आहे. याबाबत सविस्तर चर्चा झालेली आहे. एक एक हजार रूपयांमध्ये सभागृह भाड्याने देण्यात आलेली आहे. त्या ठिकाणचे दरवाजे, खिडक्याही अस्तित्वात नाहीत. सुरक्षा रक्षक असतांनाही मालमत्तांचे व्यवस्थितरित्या देखभाल होत नाही. स्थायी समितीमध्ये पुर्वी निर्णय घेण्यात आलेला आहे की, सेवाभावी संस्था, चॅरिटेबल ट्रस्ट, तेथील स्थानिक नागरीकांना अल्प दरात सभागृह भाड्याने देण्यात यावे.

मा.सभापती : केअर टेकर म्हणून देण्यात यावे.

श्री.रविकांत गवळी : मा.सभापती यांनी रूलींग दिल्यानंतरही प्रशासनाकडून अंमलबजावणी होत नाही. प्रशासनाकडून काम अंमलबजावणी होत नाही. ज्या ठिकाणी दोन हजार रूपये भाडे आहे त्या ठिकाणी प्रशासनाकडून २८ हजार रूपये आकारले जाते. असे असतांनाही महानगरपालिकेच्या मालमत्तेचे संरक्षण होत नाही.

मा. सभापती : प्रशासनाने खुलासा करावा.

उप आयुक्त (सिडको) : वेळोवेळी मालमत्ता विभागांमध्ये जे प्रस्ताव येतात त्याबाबत प्रशासकीय मान्यता घेण्यात येते. स्थायी समितीची मान्यता घेण्यात येते व त्याप्रमाणे अलॉटमेंट केली जाते. असा काही विषय स्पेसिफिक विषय असेल तर तो देण्यात यावा त्याचे निराकरण करण्यात येईल.

श्री.रविकांत गवळी : प्रशासनास निर्देश देण्यात आले होते की, बाजारभाव खाजगी इमारतीचे भाडे याबाबत माहिती घेऊन भाडे ठरविण्यात यावे म्हणुन निर्देश देण्यात आले होते.

उप आयुक्त (सिडको) : प्रचलित पध्दतीनुसार रेडी रेक्नरचा आधार घेऊन कुठल्याही इमारतीचा सभागृहाचे भाडे निश्चित करतो. स.सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यानुसार बाजुच्या खाजगी इमारतीचे भाडे विशिष्ट किंमतीच्या भाड्याने सभागृह किंवा एखादी इमारत दिली असेल तर सध्याच्या परिस्थितीमध्ये आपण रेडी रेकनर नुसार भाडे निश्चिती करतो. जर ही पध्दत बंद करायची असेल तर ही पध्दत बदलावी लागेल. सभागृहाचे तसे निर्देश असतील तर नियममान्य सर्वमान्य पध्दत अवलंबावी लागेल.

श्री.रविकांत गवळी : सभागृहाने यापुर्वीच तसे निर्देश दिलेले आहेत. महानगरपालिकेने एखादे सभागृह बांधलेले असेल तर सेवाभावी संस्थेला, स्थानिक नागरीकांना केअर टेकर म्हणून नाममात्र एक हजार रूपये दर आकारण्यात यावा/घ्यावा.

उप आयुक्त (सिडको) : यापुर्वी जे काही मा.स्थायी समितीने निर्देश दिलेले आहेत त्याप्रमाणे प्रशासकीय ठराव भाडे समितीच्या निर्णयाप्रमाणे आणलेले आहे. यामध्ये भाडे समितीने निश्चित केलेले दर आणि स्थायी समितीने निश्चित केलेले दर याबाबतची तफावत सभागृहाच्या निदर्शनास आणुन सभागृह ज्या दराप्रमाणे आदेश देईल त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी करण्यात येईल. कारण याबाबतची जनरल पॉलीसी ठरलेली नाही. त्यामुळे प्रत्येक केस, भाडे बाबतचा विषय मा.स्थायी समिती समोर आणावा लागेल. रेडी रेकनरचा आधार घेऊन भाडे समितीत दर निश्चित करण्यात येतो. रेडी रेकनर हा शासनाचा दर आहे.

मा.सभापती : जमीन खरेदीचा वेगळा दर आहे आणि भाड्याने देण्यासाठी वेगळा दर आहे.

उप आयुक्त (सिडको) : रेडी रेकनरचे दर आहे ते प्रॉपर्टीच्या किंमतीवर आधारभुत आहे.

श्री.रविकांत गवळी : भाडे समिती रेडी रेकनर प्रमाणे दर लावण्यात येतो.

उप आयुक्त (सिडको) : रेडी रेकनर हे त्या त्या एरियाच्या प्रॉपर्टीच्या किंमती दर्शवितो त्या किंमतीच्या आधारभुतच भाडे आकारले जाते.

श्री.रविकांत गवळी : महानगरपालिकेने रेडी रेकनर केलेले नाहीत का?

उप आयुक्त (सिडको) : किंमतीच्या आधारावर भाडे आकारले जाते आणि किंमतीच्या आधारावर भाडे आकारण्याची पध्दत ही सर्वमान्य आणि सर्वरूढ आहे.

श्री.रविकांत गवळी : महानगरपालिकेच्या दोन वास्तू आहेत. एका वास्तुला दर १० हजार रूपये लावले जातात आणि दुसऱ्या वास्तुचे दर २० हजार रूपये लावले जाते.

उप आयुक्त (सिडको) : मालमत्ता सांगण्यात यावी. त्याबाबतीत विचार करण्यात येईल.

श्री.रविकांत गवळी : महानगरपालिकेचे सभागृह, व्यायामशाळा, अशा काही जागा असतील त्या १००० रूपये प्रचलित अटी शर्तीनुसार भाडेतत्वावर देणे योग्य आहे. असे असतांना प्रशासनाचे म्हणणे आहे की, निर्णय झालेला नाही. पुर्णयोगी संत जनार्दन स्वामी सेवाभावी ट्रस्ट विद्यानिकेतन शाळा आहे त्यांनी दोन रूम (खोल्या) ची भाड्याने मागणी केलेली आहे. त्याचा रेडी रेकनर १६६ रूपये लावण्यात आलेला आहे. ४१०० भाडे फिक्स करण्यात येते. दोन खोल्यांना पत्रे, खिडक्या, दरवाजे नाही. वरखेडेश्वर चॅरिटेबल ट्रस्ट ११०० स्क्वेअर फुटचा दर लावण्यात आलेला आहे २८ हजार रूपये भाडे आकारण्यात येते.

मा. सभापती : रेडी रेकनर विभाग वाईज बदलण्यात येते.

श्री.रिविकांत गवळी : २८००० रूपये दर औरंगपुरा येथेही नाही.

मा. सभापती : रेट काहीही असेल तरी रेडी रेकनर प्रमाणे रेट ठरवावे लागेल.

श्री.रविकांत गवळी : रेडी रेकनर प्रमाणे १५ वर्षापुर्वी जे रेट ठरविलेले आहे. जाहीर प्रगटन अनेक वेळा दिलेले आहे. त्यावर लाखो रूपये खर्च केलेले आहे ती दुकाने भाड्याने जातात का? मिरां सलामी हॉल च्या ठिकाणी पाणी साचत होते त्याचा दर २६ हजार रूपये करून

घेण्यात आलेला आहे. आज रोजीपर्यंत दीड लाख रूपये उत्पन्न महानगरपालिकेला मिळालेले आहे. सदरील भाडे रेडी रेकनर प्रमाणे ठरविले की बाजार भावाप्रमाणे ठरविले. त्याचप्रमाणे इतर मालमत्ताही देण्यात याव्यात.

उप आयुक्त (सिडको) : महानगरपालिकेचे जे शॉपिंग कॉम्प्लेक्स आहेत ते सगळे भाड्याने गेलेले आहेत आणि जी दुकाने रेडी रेकनरच्या दराप्रमाणे जात नाहीत अशा ३५ दुकानांचा प्रस्ताव स्थायी समितीमध्ये ठेवण्यात आला होता की भाडे कमी करून डिपॉझिट कमी करावे म्हणून मान्य केलेला आहे.

श्री.रविकांत गवळी : औरंगपुरा येथील इमारतीत पहिल्या मजल्यावर चार खोल्या आहेत. भक्ती इन्टरप्राईजेस यांना ७००० रूपये प्रति महिना भाडे आकारले जाते.

मा. सभापती : भाडे समितीबाबत, भाडे लावण्याबाबत, भाडे निश्चिती बाबत रेडी रेकनर बाबत सन्माननीय सदस्यांचे मत ऐकून घेण्यात आले आहे. असे जे जे प्रकरणे आहेत, पुर्णयोगी जनार्दन शिक्षण संस्थ, जयभवानीनगर येथील एक प्रस्ताव आहे, क्रांती चौक येथील स्वामी समर्थ येथील प्रस्ताव आहे. वॉर्ड क्र.५४ येथेही मनपाची जागा आहे हे सर्व भाड्याने देण्याचा पस्ताव आलेले आहेत. अशा सर्व प्रस्तावावर नियमानुसार विचार करण्यात यावा. मंजुरी देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार श्री.वरखेडेश्वरी चॅरीटेबल ट्रस्ट, औरंगाबाद मनपाच्या मालकीचे मो.जयहिंद कॉलनी येथील सिटी मार्बल मधील हॉल भाडेपट्ट्याने देण्याकरीता आजुबाजूचे परिसरातील दरांचा विचार करून भाडे आकारणी करावी व मनपाच्या प्रचलित अटी शर्तीनुसार नियामप्रमाणे भाडेपट्ट्याने देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ४४८ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्र.क्र.३९ अंतर्गत शहागंज चमन येथील सरदार वल्लभभाई पटेल यांच्या अर्धाकृती पुतळ्या ऐवजी पुर्णाकृती पुतळा उभारणे, चौथरा बांधणे व परिसराचे सुशोभिकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन २००८-०९ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आले असून रू.१९,९४,९९३/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.१९५ दि.२४.११.०९ नुसार मान्यता प्राप्त आहे. सदर कामाचे निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण २ निविदा विक्री होऊन स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत २ निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-निविदा विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.मडिलगेकर्स आर्ट स्टुडिओ | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | रमेश बाळकृष्ण रूडसमुद्र | तांत्रिकदृष्ट्या बाद |

उपरोक्त प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा मे.मडिलगेकर्स आर्ट स्टुडीयो यांची अंदाजपत्रकीय दराने आहे. यास मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता देवून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे.

तरी मे.मडिलगेकर्स आर्ट स्टुडियो यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्र.क्र.३९ अंतर्गत शहागंज चमन येथील सरदार वल्लभभाई पटेल यांच्या अर्धाकृती पुतळ्या ऐवजी पुर्णाकृती पुतळा उभारणे, चौथरा बांधणे व परिसराचे सुशोभिकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी मे.मडिलगेकर्स आर्ट स्टुडिओ यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्राणी संग्रहालय येथील प्राण्याच्या पिंजऱ्याची देखभाल दुरूस्ती व इतर कामे करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याचे सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रक रक्कम रू.१४,९७,४००/- चे आहे. सदर काम प्राणी संग्रहालय विकास कामे, या लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावित असून या कामासाठी सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात पान क्र.GBR-Z-०१ अ.क्र.०२ नुसार तरतूद उपलब्ध आहे. स्थायी समिती सभा दि.२२.१२.२००९ रोजी ठराव क्र.२५३ नुसार अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर ई-टेंडरींग विभागामार्फत निविदा बोलविण्यात आल्या असता स्वीकृतीच्या अंतिम तारखेस श्री.काझी नुर मोहीयोद्दीन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराची निविदा प्राप्त झाली. परंतू मा.आयुक्त यांनी ५% कमी दराने या कामास मान्यता दिली आहे. श्री.काझी नुर मोहीयोद्दीन यांची ५% कमी दराच्या निविदेचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्राणी संग्रहालय येथील प्राण्याच्या पिंजऱ्याची देखभाल दुरूस्ती व इतर कामे करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदेनुसार सदरील काम श्री.काझी नुर मोहीयोद्दीन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्राणी संग्रहालयाची संरक्षित भिंत दुरूस्ती करणे व काही ठिकाणी संरक्षित भिंतीची उंची वाढविणे आवश्यक असल्यामुळे उपलब्ध तरतुदीनुसार सा.बां.खात्याचे सन २००८-०९ च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून अंदाजपत्रक र.रू.१४,९६,६९८/- चे आहे. सदर काम प्राणी संग्रहालय विकास कामे या लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावित असून या कामासाठी सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात पान क्र. GBR-Z-०१ अ.क्र.०२ नुसार तरतूद उपलब्ध आहे. स्थायी समिती सभा दि.२२.१२.२००९ रोजी ठराव क्र.२५२ नुसार अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर ई-टेंडरींग विभागामार्फत निविदा बोलविण्यात आल्या असता स्विकृतीच्या अंतिम तारखेस श्री.काझी नुर मोहीयोद्दीन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराची निविदा प्राप्त झाली. कंत्राटदारासोबत वाटाघाटी केल्यानंतर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% कमी दराने काम करण्यास कंत्राटदार यांनी संमती दर्शविली. ३% कमी दरास मा.आयुक्त यांची मान्यता प्राप्त झाली आहे.

श्री.काझी नुर मोहीयोद्दीन यांची ३% कमी दराची निविदा मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्राणी संग्रहालयाची संरक्षित भिंत दुरूस्ती करणे व काही ठिकाणी संरक्षित भिंतीची उंची वाढविणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदेनुसार सदरील काम श्री.काझी नुर मोहीयोद्दीन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या हर्सुल/सावंगी तलाव हा मत्स्यव्यवसायासाठी श्री.नितीन गजानन पंडोरे यांना सन २००६-०७ ते २०१०-११ पर्यंत पाच वर्षासाठी १०% नैसर्गिक वाढ प्रतिवर्षी याप्रमाणे ठेका देण्यात आला होता. परंतु संबंधीताने या कार्यालयात अर्ज देऊन विनंती केली आहे की, त्यांना सन २००७-०८, २००८-०९ या दोन वर्षी तलावातील पाण्याची पातळी समाधानकारक राहिली नाही व कर्ज घेवून तलावात मत्स्यबीज सोडले

होते. त्याची देखील भरपाई झालेली नाही. करीता त्या वर्षाच्या ठेक्याच्या रक्कमेत ५०% सुट/सवलत द्यावी अशी विनंती केलेली आहे.

यापुर्वी मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.२५४ दिनांक २७/२/२००७ अन्वये डॉ.सलीमअली सरोवर येथील मत्स्यव्यवसाय ठेकेदार श्री.शेख शामद शेख अमीर यांना त्या काळात मत्स्यव्यवसायात नुकसान झाल्याने सहा महिन्यासाठी विना मोबदला वापरण्यास दिले होते. (प्रतिवर्ष रू.६ लाख ६५ हजार मध्ये सदरील ठेका देण्यात आला होता.)

त्याआधारे नैसर्गिक न्यायतत्वानुसार श्री.नितीन गजानन पंडोरे यांना सन २००७-०८, २००८-०९ या दोन वर्षी मत्स्यव्यवसायात नुकसान झालेले असल्याने या दोन वर्षाच्या ठेक्याच्या रक्कमेत ५०% सुट/सवलत देण्याच्या मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : भगवान घडमोडे अनुमोदक : सतीश कटकटे

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.नितीन गजानन पंडोरे यांना हर्सुल/सावंगी तलावातील मत्स्यव्यवसायाच्या ठेक्यामध्ये सन २००७-०८, २००८-०९ या दोन वर्षी नुकसान झालेले असल्याने या दोन वर्षाच्या ठेक्याच्या मुळ रक्कमेत ५०% सुट/सवलत देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियामप्रमाणे कार्यवाही करावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ४५२ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ४८ अंतर्गत एन-६ सिडको येथील समाज मंदिर सुरक्षित व स्वच्छ राहण्यासाठी याचे केअर टेकर म्हणून "वारकरी मित्र मंडळ, अविष्कार कॉलनी, एन-६, सिडको, औरंगाबाद" या बहुउद्देशीय संस्थेस बाल संस्कार वर्ग, मोफत वाचनालय, भजन, किर्तन, रक्तदान शिबीरे इत्यादी उपक्रम राबविण्यासाठी देण्यात यावे.

करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : दत्ताभाऊ पाथ्रीकर अनुमोदक : भगवान घडमोडे

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ४८ अंतर्गत एन-६ सिडको येथील समाज मंदिर सुरक्षित व स्वच्छ राहण्यासाठी "वारकरी मित्र मंडळ, अविष्कार कॉलनी, एन-६, सिडको, औरंगाबाद" या बहुउद्देशीय संस्थेस बाल संस्कार वर्ग, मोफत वाचनालय, भजन, किर्तन, रक्तदान शिबीरे इत्यादी उपक्रम राबविण्यासाठी याचे केअर टेकर म्हणून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद